



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २४.०९.२०२६ | अंक नं. १५० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020




# भिंगारमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**पोलिसांवर गंभीर आरोप, गणेश विसर्जन थांबवत ठिय्या आंदोलन, रास्ता रोको; शहरात कडकडीत बंद**

नगर - भिंगार येथे २३ सप्टेंबर रोजी रात्री गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान सिव्हील इंजिनियर असलेले शुक्लेश्वर तरुण मंडळाचे अध्यक्ष दीपक रामकिसन वाघस्कर (वय ४०, रा.वाघस्कर गल्ली, भिंगार) यांचा रस्त्यावर कोसळून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. वाघस्कर यांच्या मृत्यूनं शहरात खळबळ उडाली. या घटनेवरून पोलिसांवर गंभीर आरोप करत गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणेश मूर्तीचे विसर्जन न करता मिरवणूक जागेवरच थांबवून रात्री उशिरापर्यंत भिंगार वेस येथे ठिय्या आंदोलन केले. तसेच २४ सप्टेंबर रोजी सकाळ पासूनच भिंगार शहरात कडकडीत बंद पाळण्यात येवून नगर पाथर्डी रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यामुळे दुपारी उशिरा पर्यंत अनेक गणेश मूर्ती रस्त्याच्या कडेलाच ठेवण्यात आलेल्या होत्या त्यामुळे तणाव कायम होता.



दीपक वाघस्कर (मयत)

अहिल्यानगर शहरालगतच्या भिंगार उपनगरात गणेश विसर्जन मिरवणुकीला रात्री गालबोट लागले. मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जनंतर दीपक वागसकर या तरुणाचा मृत्यू झाल्याचा आरोप गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. गुलाल उधळण्यावरून पोलीस आणि मंडळाच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला आणि त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचा दावा कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. या घटनेनंतर भिंगार परिसरात संतापाची लाट उसळली. शहर विभागाचे पोलीस उपअधिक्षक दिलीप टिपरसे आणि भिंगार पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या कारवाईमुळेच लाठीचार्ज झाला, असा आरोप मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

## 'जालियानवाला बाग' चा संदर्भ देत आ.संग्राम जगताप आक्रमक

दरम्यान राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार संग्राम जगताप यांनी या घटनेच्या निषेधार्थ आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी रात्री दोन वाजेपर्यंत भिंगारमध्ये रस्त्यावर बसून ठिय्या आंदोलन केले. यावेळी त्यांनी पोलीस उपअधीक्षक डॉ.दिलीप टिपरसे यांच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे आरोप केले. पंजाब मधील जालियानवाला बाग गोळीबार प्रकरणाचा दाखला देत जनरल डायर ची भूमिका शहरात बजावणारा हा अधिकारी आपल्याला नको, अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त करत दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, संबंधित अधिकाऱ्यांची तात्काळ बदली करावी, अशी मागणी कार्यकर्त्यांकडून करण्यात आली. मागण्या मान्य होईपर्यंत भिंगार बंद ठेवण्यासह गणेश विसर्जन न करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतल्याचं आमदार संग्राम जगताप यांनी सांगितलं.

## व्हायरल व्हिडीओबाबत पोलीस अधीक्षकांनी दिले स्पष्टीकरण

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान पोलिसांनी केलेल्या लाठीमाराबाबतच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओबाबत आणि दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूबाबत पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांनी २४ सप्टेंबर रोजी प्रसार माध्यमांशी बोलताना स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले, विसर्जन मिरवणुकीत ट्रॅक्टरला लावलेली ट्रॉली हलत होती. या ट्रॉलीवर काही मुले असल्याने त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना खाली उतरवण्यासाठी पोलिसांनी त्यांच्या पायावर सौम्य लाठीमार केला. मात्र, या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला. याच लाठीमारात दीपक वाघस्कर यांच्यावर मारहाण झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची चर्चा सुरु झाली.

मात्र हा लाठीमाराचा व्हिडीओ रात्री ९ वाजेच्या सुमाराचा आहे. त्यात दीपक वाघस्कर नव्हते. ते तेथे उपस्थितही नव्हते. रात्री त्यांच्या मंडळापासून ते घरी जायला निघाले, तेव्हा साधारण रात्री ९.५५ च्या सुमारास ते खाली पडले. त्यांना तातडीने त्यांचे सहकारी आणि बंदोबस्तावरील पोलिसांनी रुग्णालयात हलविले. मात्र त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले आहे. दरम्यान, दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूचं नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोस्टमार्टम अहवालानंतर मृत्यूचे कारण समोर येणार असून, त्यानंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होईल, अशी माहिती पोलीस अधीक्षकांनी दिली. या संपूर्ण प्रकरणाची योग्य ती चौकशी सुरु केलेली असून जर यात कोणी दोषी आढळले तर त्यांना पाठीशी न घालता कायदेशीर कारवाई केली जाईल, असेही पोलिस अधिक्षक सुदर्शन यांनी सांगितले. लाठीमाराच्या व्हिडीओबाबत चुकीच्या चर्चा करून अफवा पसरवू नका, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले आहे. आता सर्वांचे लक्ष पोस्टमार्टम अहवालाकडे लागले असून, दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूमागचे नेमके कारण काय, लाठीमाराचा त्यांच्याशी संबंध होता का? आणि या प्रकरणात नेमकी चूक कोणाची होती? याचं उत्तर चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान मयत दीपक वाघस्कर यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, बहिण, २ चुलते, चुलत भाऊ असा परिवार आहे.

# भिंगार प्रकरणाची अप्पर पोलिस अधीक्षकांमार्फत चौकशी तर वाघस्कर मृत्यूचा तपास एलसीबीकडे

**चौकशी होईपर्यंत भिंगार कॅम्पचे प्रभारी अधिकारी व काही कर्मचारी सक्तीच्या रजेवर**

नगर - भिंगार येथे गणेश विसर्जन मिरवणूकी दरम्यान पोलिसांकडून झालेल्या लाठीचार्ज प्रकरणाची श्रीरामपूरचे अप्पर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्फत चौकशी केली जाणार आहे. तसेच दिपक वाघस्कर यांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूची चौकशी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या चौकशी दरम्यान भिंगार कॅम्पच्या प्रभारी अधिकारी सपोनि तेजस्वी थोरात यांच्यासह काही कर्मचाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणार असल्याची माहिती अप्पर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

वाघस्कर यांच्या मृत्युमुळे रात्री पासून भिंगारमध्ये तणाव पूर्ण वातावरण आहे. गणेश मंडळांनी मिरवणूक थांबवून गणेश विसर्जनावर बहिष्कार टाकला होता. तसेच सकाळ पासून शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी दुपार पासून वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरु झाल्या. आ. संग्राम जगताप हे पोलीस उपअधीक्षक दिलीप टिपरसे आणि भिंगार पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या कारवाईमुळेच लाठीचार्ज झाला असा आरोप करत त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीवर ठाम होते. दुपारी अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपअधिक्षक अमोल भारती यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जावून बैठक घेतली. यावेळी आ. जगताप यांनी या प्रकरणाची एसआयटी नेमून चौकशी करावी, चौकशी होईपर्यंत प्रभारी अधिकारी व काही कर्मचारी यांना सक्तीच्या रजेवर पाठवावे अशी मागणी आ. संग्राम जगताप यांनी या बैठकीत केली. या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना अप्पर अधीक्षक कलुबर्मे यांनी पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या कारवाईची माहिती दिली. वाघस्कर यांचे नातेवाईक, लोकप्रतिनिधी, विविध संघटनांचे प्रतिनिधी यांनी जे काही आक्षेप नोंदवले त्याचा सविस्तर अहवाल सायंकाळी शासनाला सादर केला जाणार आहे. तसेच या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली असून त्याचाही अहवाल शासनाकडे पाठविला जाणार आहे.

यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, भिंगार मधील ही घटना दुर्दैवी आहे. पोलिसांच्या नियोजनाचा अभाव या मागे असल्याची प्रतिक्रीया भिंगारच्या सर्वसामान्य जनतेकडून व्यक्त होत आहे. पोलिसांविषयी नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. नगर मधील एक पोलिस अधिकारी हिंदूंचे सण होऊच नयेत असा प्रयत्न करत असल्याचा आक्षेप आपण दहा दिवसापुर्वीच घेतला होता मात्र त्याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली आहे. याबाबत यापुढेही चुकीचे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईसाठी पाठपुरावा करणार असल्याची त्यांनी सांगितले. पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीमुळे रात्रीपासून थांबवलेल्या गणेश विसर्जनाबाबत सर्व मंडळांशी चर्चा करून पुढील कार्यवाही करू असेही ते म्हणाले.



भिंगार मध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान दीपक वाघस्कर यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या निषेधार्थ गणेश मंडळांनी विसर्जनावर बहिष्कार टाकल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या गणेश मूर्ती, या घटनेच्या निषेधार्थ भिंगार शहरात पाळण्यात आलेला कडकडीत बंद दुसऱ्या छायाचित्रात तर नगर पाथर्डी रोडवर रास्ता रोको करताना मंडळाचे कार्यकर्ते व नागरिक तिसऱ्या छायाचित्रात दिसत आहेत. (छायाचित्र - बबलू शेख)

## दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूप्रकरणी भिंगार शहर परिसरात कडकडीत बंद

दीपक वाघस्कर यांच्या मृत्यूप्रकरणी भिंगार परिसरात संतापाचं वातावरण निर्माण झालं आहे. या घटनेच्या निषेधार्थ भिंगारमधील गणेश मंडळांनी गणेश विसर्जन न करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आज २४ सप्टेंबर रोजी सकाळ पासून भिंगारमध्ये बंद पाळण्यात आला. सर्व व्यापारी दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवली. त्यामुळे नेहमी गजबजलेल्या बाजारपेठ परिसरात शुकशुकाट दिसत होता. गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी गणेश विसर्जनावर बहिष्कार टाकल्याने सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्ती रस्त्याच्या कडेला तशाच ठेवण्यात आलेल्या होत्या. या ठिकाणी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला होता. कार्यकर्त्यांनी तसेच नागरिकांनी पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी बराच वेळ नगर पाथर्डी रस्त्यावर रास्ता रोको आंदोलनही केले.

# कर्जबाजारी शेतकरी महिलेची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

**दुष्काळाच्या झळा; शेतीतील उत्पन्न घटले; कर्जाचा वाढता बोजा आणि आजारपणाच्या खर्चाने आर्थिक विवंचना**

नगर - दुष्काळी परिस्थिती, शेतीतून अपेक्षित उत्पन्न नाही, डोक्यावर वाढत गेलेला कर्जाचा बोजा आणि त्यातच आजारपणाच्या उपचारांचा खर्च अशा आर्थिक विवंचनेतून खडकी (ता. नगर) येथील दीपाली प्रकाश रोकडे (वय ३७) या शेतकरी महिलेने घराजवळील विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. २३ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा ही घटना घडली असून, २४ सप्टेंबर रोजी पहाटे हा प्रकार निदर्शनास आला.



दीपाली रोकडे (मयत)

दीपाली रोकडे यांच्या कुटुंबाकडे अवघी साडेतीन ते चार एकर शेती आहे. शेती आणि मोलमजुरीच्या उत्पन्नावर कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू होता. मात्र, गेल्या काही काळात कुटुंबावरील आर्थिक संकट वाढत गेले. दोन वर्षांपूर्वी घर बांधण्यासाठी घेतलेले हातउसने स्वरूपातील सुमारे चार ते पाच लाख रुपयांचे कर्ज, त्यानंतर अलाहाबाद बँकेचे सुमारे एक लाख रुपये, सेवा सोसायटीचे सुमारे ४० हजार रुपये तसेच खेळते भांडवल कर्जाचे ३५ हजार रुपये, असा कर्जाचा मोठा बोजा कुटुंबावर असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

त्यातच काही दिवसांपूर्वी दीपाली यांच्यावर आजारपणामुळे उपचार करण्यात आले होते. उपचारासाठी झालेल्या खर्चामुळे कुटुंबाच्या आर्थिक अडचणीत आणखी भर पडली. यंदाच्या खरीप हंगामात पेरणी करूनही पुरेसा पाऊस न झाल्याने शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळाले नाही. पुढील काळातही पावसाची परिस्थिती समाधानकारक नसल्याने शेतीतून उत्पन्नाची शक्यता कमी झाली होती. एकीकडे कर्जाची परतफेड कशी करायची, तर दुसरीकडे आजारपणाचा खर्च कसा भागवायचा, असा प्रश्न कुटुंबासमोर उभा राहिला होता. अशी माहिती नातेवाईकांनी दिली.

दीपाली यांचे पती प्रकाश रोकडे हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. शेतीचे उत्पन्न कमी झाल्याने मोलमजुरीच्या उत्पन्नावर घरखर्च भागविणे, कर्जाची परतफेड करणे आणि उपचारांचा खर्च पेलणे कठीण झाले होते. याच पार्श्वभूमीवर दीपाली यांनी २३ सप्टेंबर रोजी रात्री रात्री घराजवळील विहिरीत उडी घेतल्याचे सांगण्यात आले. २४ सप्टेंबर रोजी पहाटे हा प्रकार लक्षात आल्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांना माहिती दिली. दीपाली रोकडे यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी आणि सासू असा परिवार आहे. या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, दोन मुलांच्या डोक्यावरून आईचे छत्र हरपले आहे.


## मदत कागदावर नको, तर शेतकऱ्यांच्या बांधावर द्या

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने पहिल्या टप्प्यात मदत द्यावी. पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करून नुकसानभरपाई द्यावी. तसेच कर्जाबाबत दिलासा आणि आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत मिळावी. शासनाची मदत केवळ कागदावर न राहता ती प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचली पाहिजे, अशी अपेक्षा माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले यांनी व्यक्त केली.

## मुख्यमंत्र्यांच्या दुष्काळ पाहणी दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकरी कुटुंबांचा प्रश्न ऐरणीवर

राज्यातील अनेक भागांत कमी पावसामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त भागाचा पाहणी दौरा केला आहे. दुष्काळाबाबत लवकरच शासन निर्णय काढून शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

अशा परिस्थितीत खडकी येथील शेतकरी महिलेच्या आत्महत्येच्या घटनेने कर्जबाजारी आणि अल्पभूधारक शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक संकटाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शेतीचे नुकसान, वाढता कर्जबोजा आणि वैद्यकीय खर्च यामुळे अडचणीत आलेल्या कुटुंबांना शासनाच्या मदतीची तातडीने गरज असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी २ नोव्हेंबर रोजी होणार मतदान

**२८ सप्टेंबरपासून उमेदवारी दाखल होणार, २१ ऑक्टोबरला माघारीची अंतिम तारीख**

नगर - जिल्हा सहकार बँकेच्या निवडणुकीसाठी येत्या २ नोव्हेंबरला मतदान प्रक्रिया पार पडून ३ नाव्हेंबरला मतमोजणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याबाबत प्रारूप निवडणूक कार्यक्रम तयार करून तो सहकार निवडणूक प्राधिकरण यांच्याकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवण्यात आला होता. त्यास सहकार निवडणूक प्राधिकरणाने मान्यता दिली असून या मान्यतेनुसार जिल्हा बँकेसाठी आता २ नोव्हेंबरला मतदानाची प्रक्रिया पूर्ण होऊन तीन नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, येत्या २८ सप्टेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार असून ही मुदत ५ ऑक्टोबरपर्यंत राहणार आहे. २८ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या ८ दिवसांच्या काळात इच्छुक उमेदवारांना सकाळी ११ ते दुपारी तीन या वेळेत बँकेची नगर भाजीपाला मार्केट यार्ड मागील बाजू असणार्या चाहूराना बुद्रुक या शाखेत निवडणूक कार्यालय सुरू राहणार आहे त्या ठिकाणी उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. निवडणुकीसाठी दररोज दाखल होणार्या अर्जाची यादी त्यादिवशी संबंधित कार्यालयात चार वाजता प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ६ ऑक्टोबरला दाखल सर्व अर्जांची छाननी पूर्ण करून वैध इच्छुकांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या प्रक्रियेनंतर ७ ऑक्टोंबर ते २१ ऑक्टोंबर दरम्यान दाखल अर्ज पैकी ज्यांना माघार घ्यायची त्यांच्यासाठी वेळ राखून ठेवण्यात आलेली आहे. या काळात दाखल अर्जापैकी ज्यांना माघार घ्यायची आहे ते विहित नमुन्यात अर्ज दाखल करून जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून माघार घेऊ शकणार आहेत. त्यानंतर २२ ऑक्टोंबरला निवडणुकीतील अंतिम मतदारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून त्यानंतर २ नोव्हेंबरला बँकेसाठी प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया होऊन तीन नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे.

या निवडणूक कार्यक्रमाला राज्य सहकार निवडणूक प्राधिकरण यांनी मान्यता दिले आहे.

# नालेगावच्या तरूणाचा पांगरमल शिवारात संशयास्पद मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील पांगरमल शिवारात बेशुध्द अवस्थेत आढळून आलेल्या तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना २३ सप्टेंबर रोजी दुपारी उघडकीस आली. सागर महादेव उरूडे (वय २८, दातरंगे मळा, नालेगाव) असे मयत तरूणाचे नाव आहे. सागरच्या अंगावर मारहाणीच्या तसेच चटके दिल्याच्या खुणा आढळून आल्याने त्याच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी एका संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेतले असून, सागरचा मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सागर उरूडे हा पांगरमल शिवारातील त्याच्या मित्राकडे गेला होता. २३ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास गुडलक हॉटेल परिसरात तो बेशुध्द अवस्थेत आढळून आला. त्यानंतर त्याला तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. सागरच्या अंगावर मारहाणीच्या खुणा तसेच चटके दिल्याच्या खुणा असल्याचे समोर आले. त्यामुळे त्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत संशय निर्माण झाला आहे. त्याच्यावर मारहाण करण्यात आली होती का, त्याला चटके देण्यात आले होते का आणि त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली का, या विविध शक्यतांच्या अनुषंगाने पोलिसांकडून तपास केला जात आहे.

घटनेची माहिती मिळताच नगर ग्रामीणचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने आणि एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक हेमंत थोरात यांनी पोलीस पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनाक्रमाची माहिती घेऊन, सागरसोबत असलेल्या व्यक्तींसह संबंधितांची चौकशी केली जात आहे.

दरम्यान सागर याच्या मृत्यू बाबत संशय निर्माण झाल्याने पोलिसांनी त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी छत्रपती संभाजी नगर येथील घाटी शासकीय रुग्णालयात पाठविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार तो घाटी रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. तेथील शवविच्छेदन अहवाल आल्यावरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.





गणेश विसर्जन मार्गावरील अतिक्रमणे हटविताना महापालिकेचे पथक.

# शहरातील विसर्जन मार्गावरील अतिक्रमणे मनपाने हटविली

## हातगाड्या, टपऱ्या, दुकानांचे साहित्य जप्त

नगर - २५ सप्टेंबर रोजी शहरात गणेश विसर्जन मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जन मिरवणुकीला कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, म्हणून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने विसर्जन मार्गावरील सर्व अतिक्रमणे हटवून मार्ग मोकळा केला. तसेच यापुढे पुन्हा अतिक्रमण केल्यास संबंधितांवर कायदेशीर व कडक कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशाराही मनपा प्रशासनाने दिला आहे.

२४ सप्टेंबर रोजी महापालिकेचे पथक वाहनासह शहरातील मिरवणूक मार्गावर पोहोचले. मार्गाची पाहणी करुन अतिक्रमण करणाऱ्यांना अतिक्रमण काढून घेण्याच्या सुचना केल्या. ज्यांनी अतिक्रमण हटविले नाही, त्यांचे अतिक्रमण महापालिकेच्या पथकाने स्वतःहून काढून टाकून साहित्य जप्त केले. शहरातील मुख्य विसर्जन मिरवणूक मार्गांवर नागरिकांची आणि मंडळांची होणारी गर्दी लक्षात घेऊन मनपाच्या पथकाने ही मोहीम राबवली. यात माळीवाडा चौक, पंचपीर चावडी, आडते बाजार, चितळे रोड, तेली खुंट चौक, रामचंद्र खुंट, हातमपुरा चौक आणि बाळाजी बुवा विहीर परिसरातील अतिक्रमणांवर मनपाच्या पथकाने कारवाई केली. रस्त्यांवर लावलेल्या हातगाड्या, भाजी व फळविक्रेत्यांचे स्टॉल, अनधिकृत फ्लेक्स बोर्ड, टपऱ्या तसेच दुकानदारांनी दुकानाबाहेर रस्त्यावर पसरलेले साहित्य या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आले. ही कारवाई महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाचे प्रमुख आदित्य बल्लाळ आणि क्षेत्रीय अधिकारी नितीन इंगळे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.

### विसर्जनस्थळांची स्वच्छता

विसर्जनादरम्यान भाविकांची असुविधा होऊ नये म्हणून मनपाच्या वतीने विसर्जनस्थळांच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली आहे. बाळाजी बुवा विहीर, यशोदानगर येथील विहीर परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे. तसेच शहरात एकाच ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी मनपा प्रशासनाने विविध भागात १८ कृत्रिम विसर्जन कुंडांची निर्मिती केली आहे.

### येथे करता येणार विसर्जन

बाळाजी बुवा विहीर, यशोदानगर विहीर, तसेच बुरुडगाव रोड, साईनगर, बोल्हेगाव, साईनगर ओपन स्पेस, निर्मलनगर, साईबाबा मंदिराजवळील मोकळी जागा, सावेडी जॉगिंग ट्रॅक, आयुर्वेद कॉलेज परिसर, झरेकर गल्ली, केडगाव, देवी मंदिरासमोरील जागा, भूषणनगर, पाण्याच्या टाकीजवळ, सारसनगर, भिंगार नाला पुलाशेजारी, शिवनेरी चौक, स्टेशन रोड, गोविंदपुरा, यशवंत महाविद्यालय, गाडे शाळा, भिस्तबाग महाल परिसरातील दोन कृत्रिम कुंड, गांधी मैदान पटांगण, पांजरापोळ पटांगण, मार्केट यार्ड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, दाणेडबरा, मोतीनगर खुली जागा, केडगाव-बोल्हेगाव जिल्हा परिषद शाळेच्या पाठीमागील जागा, ताठे मळा, जिल्हा कृषी विभाग कार्यालयाजवळ, नगर-दौंड रोड, हनुमाननगर येथील कृत्रिम कुंडांमध्ये विसर्जन करता येणार आहे. नागरिकांनी या कृत्रिम हौदांचा जास्तीत जास्त वापर करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### विसर्जनस्थळांची महापौरांकडून पाहणी

गणेश विसर्जनस्थळांची तसेच भिस्तबाग महाल परिसरातील स्वच्छता व विविध उपाययोजनांची महापौर ज्योतीताई गाडे यांनी पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, नगरसेविका शितलताई ढोणे, नगरसेवक महेश लोंढे, शहर अभियंता मनोज पारखे, आनंद पुंड यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## दीपक बोनेकर यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार - दाणेगल्ली येथील रहिवासी दीपक रामभाऊ बोनेकर (वय ४५) यांचे २४ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई असा परिवार आहे.

## सुषमाबाई बोरा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - नाशिक येथील रहिवासी श्रीमती सुषमाबाई रतनकुमार बोरा (वय ८३) यांचे २४ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नाशिक अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रिती शहा, स्वाती लोढा यांच्या मातोश्री, डॉ. प्रदीप, रविंद्र बोरा यांच्या भगिनी तर स्वातंत्र्य सैनिक स्व. डॉ. भी. मु. बोरा यांच्या कन्या होत.

## निवृत्त इंजिनिअर रामभाऊ सोनवणे यांचे निधन



नगर - हिंगणगाव येथील रहिवासी सेंट्रल गव्हर्नमेंटच्या सी.क्यू.ए.व्ही. (CQAV) कार्यालयातील निवृत्त इंजिनिअर रामभाऊ जबाजी सोनवणे (वय ८४) यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी केंद्र सरकारच्या CQAV कार्यालयात तब्बल ३८ वर्षे इंजिनिअर या पदावर निष्ठापूर्वक सेवा बजावली होती. उद्योजक दीपक सोनवणे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा पत्नी, दोन मुली सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## प्रमोद सोबले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - केडगाव येथील रहिवासी व निवृत्त शिक्षक प्रमोद नामदेव सोबले (वय ८४) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेत त्यांनी ३८ वर्षे अध्यापनाचे कार्य केले. शिस्तप्रिय, पण तितकेच प्रेमळ अशी त्यांची ख्याती होती. निवृत्त उपनिबंधक मिलिंद सोबले, तसेच नितीन, मुकुंद सोबले व डॉ. स्नेहलता ज्ञानदेव चोपडे यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर केडगाव स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## संगीताबाई खामकर यांचे हृदयविकाराने निधन



नगर - घारगाव येथील रहिवासी सौ. संगीताबाई रामभाऊ खामकर (वय ५७) यांचे २३ सप्टेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर घारगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे पती, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रजल व राणी यांच्या त्या मातोश्री होत.

## माळीवाडा येथून मोपेडची चोरी

नगर -शहरातील माळीवाडा वेस परिसरातुन सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड (क्र. एमएच १६ सीयु ३०१०) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते ११.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत अनिल बाबुराव सुरवसे (वय २५, रा. शाहूनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी २२ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास त्यांची मोपेड माळीवाडा वेस येथे सागर फॅशन दुकानाशेजारी रस्त्याच्या कडेला लावली होती. ती मोपेड कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. त्यामुळे सुरवसे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी जिल्हा पोलीस प्रशासन सज्ज

## ड्रोनसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर; अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात

नगर - नगर शहरासह जिल्ह्यातील गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. जिल्ह्यात सुमारे ३ हजार ३१२ लहान-मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना केली असून २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या दिवशी बाप्पाला निरोप देण्यात येणार आहे. दरम्यान, पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे साडेतीन हजार पोलीस व होमगार्ड यांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या मिरवणुकांवर ड्रोनसह सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे नजर ठेवली जाणार आहे.

नगर शहरात पहिला मानाचा गणपती असलेल्या ग्रामदैवत विशाल गणपती मंदिरात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते श्री गणेशाची उत्थापन पूजा होऊन सकाळी १० वाजता मिरवणुकीला सुरूवात होणार आहे. माळीवाडा विशाल गणपती नंतर मानाची गणेश मंडळे मुख्य मिरवणुकीत सहभागी होणार आहेत. मिरवणूक मार्गावर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात येणार आहेत. तसेच स्थानिक दुकाने व इतर आस्थापनांच्या कॅमेऱ्याची ही मदत मिरवणुकीवर लक्ष ठेवण्यासाठी घेतली जाणार आहे. मिरवणूक मार्ग व त्या लगतच्या परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी फिक्स पाईंटवर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहेत. केडगाव उपनगर, सावेडी उपनगर परिसरातही अनेक मंडळे स्वतंत्र मिरवणुका काढणार आहेत.

जिल्ह्यात यंदा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जात आहे. जिल्ह्यात ३ हजार ३१२ लहान-मोठ्या सार्वजनिक व खासगी गणेश मंडळांसह २५५ गावांत 'एक गाव एक गणपती' संकल्पनेतून श्री गणेशाची स्थापना केली आहे. नगर शहरासह जिल्ह्यातील संगमनेर, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव, कोपरगाव, जामखेड या प्रमुख शहरासह ग्रामीण भागातील छोट्या- मोठ्या मंडळातील श्री गणेशाचे उद्या विसर्जन केले जाणार आहे. संबंधीत पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### मिरवणुकीत डीजे व लेझरला मनाई

गणेश विसर्जन मिरवणुकीत ध्वनी प्रदूषणासह अन्य नियमांचे पालन करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. प्लाझ्मा-लेझरचा वापर करू नये तसेच मोठ्या आवाजातील डीजे न वाजवता पारंपरिक वाद्यांचा वापर करावा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचा भंग करून ध्वनी प्रदूषण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

### जिल्ह्यातील ६२३ गुन्हेगार हद्दपार

विसर्जन मिरवणुकीच्यावेळी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच भारतीय न्याय संहिता कलम १६३ नुसार ६२३ गुन्हेगारांना विसर्जन मिरवणुकीच्या काळात हद्दपार करण्यात आले आहे. अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यातील गुन्हेगारांचा यामध्ये समावेश आहे.

### जिल्ह्यासाठी असा आहे पोलीस बंदोबस्त

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली २ अप्पर पोलीस अधीक्षक, १० पोलीस उपअधीक्षक, २५ पोलीस निरीक्षक, २०० सहाय्यक निरीक्षक व उपनिरीक्षक, २२०० पोलीस कर्मचारी, होमगार्ड, एसआरपीएफची एक तुकडी, क्यूआरटीच्या दोन तुकड्या, स्ट्रायकिंग फोर्स १०, साध्या वेशातील पोलिसांची पथके, छेडछाड विरोधी पथक, ध्वनी प्रदूषण पातळी मोजण्यासाठी स्वतंत्र पथक असणार आहे.





गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी गणेशभक्तांची झालेली गर्दी आणि वाहतूक कोंडी. या वाहतूक कोंडीत काही अवजड वाहनेही दिसून येत आहेत.

# गणेशोत्सवात वाहतूक नियोजनाचा अभाव; अवजड वाहतुकीमुळे कोंडीत भर

नगर - गणेशोत्सवातील विविध गणेश मंडळांचे आकर्षक देखावे पाहण्यासाठी दररोज सायंकाळी शहरातील विविध भागांत गणेशभक्त व नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. मात्र, वाढत्या गर्दीच्या तुलनेत शहरातील वाहतूक व्यवस्थेचे पुरेसे नियोजन नसल्याने अनेक प्रमुख रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे गणेशभक्तांसह वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

गणेशोत्सवातील देखावे पाहण्यासाठी सायंकाळपासून रात्री उशिरापर्यंत नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. कुटुंबांसह महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलेही मोठ्या संख्येने देखावे पाहण्यासाठी बाहेर पडत आहेत. अनेक ठिकाणी नागरिकांकडून वाहने रस्त्याच्या कडेला किंवा जेथे जागा मिळेल, तेथे उभी केली जात असल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. त्यातच प्रमुख मार्गांवर एकाच वेळी मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ वाढत असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

सायंकाळी गर्दी वाढण्यास सुरुवात झाल्यानंतर वाहतूक कोंडी निर्माण झाल्यावर उपाययोजना करण्याऐवजी गर्दीच्या वेळेपूर्वीच वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे. प्रमुख चौक, गणेश मंडळांचे देखावे असलेले मार्ग तसेच गर्दीची शक्यता असलेल्या ठिकाणी वाहतूक पोलिसांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून वाहतूक सुरळीत ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गणेशोत्सव हा शहरातील नागरिकांसाठी उत्साहाचा आणि धार्मिक श्रद्धेचा सण आहे. त्यामुळे गणेशभक्तांना कोणताही त्रास न होता सुरक्षितपणे देखावे पाहता यावेत, यासाठी पोलीस प्रशासन आणि शहर वाहतूक नियंत्रण शाखेने समन्वयाने प्रभावी वाहतूक आराखडा राबविण्याची गरज आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही स्वयंसेवकांच्या माध्यमातून वाहनांच्या शिस्तबद्ध पार्किंगची व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांनीही शक्यतो रस्त्यावर वाहने उभी करू नयेत तसेच गर्दीच्या मार्गांवर जाण्याऐवजी पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

गणेशोत्सवातील उर्वरित दिवसांमध्ये नागरिकांची गर्दी आणखी वाढण्याची शक्यता लक्षात घेता पोलीस प्रशासनाने शहरातील वाहतूक व्यवस्थेचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. प्रमुख मार्गांवरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी योग्य नियोजन, पुरेसा मनुष्यबळाचा वापर आणि अवजड वाहनांच्या वाहतुकीबाबत आवश्यक नियंत्रण ठेवावे, अशी मागणी गणेशभक्त आणि वाहनचालकांकडून होत आहे.

### पर्यायी मार्ग, पार्किंग व्यवस्था आवश्यक

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील प्रमुख गणेश मंडळांचे देखावे पाहण्यासाठी नागरिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे गर्दीच्या ठिकाणी वाहतूक वळविणे, पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, वाहनतळांची व्यवस्था करणे, प्रभावी रहदारी नियमन करणे तसेच प्रमुख चौकांवर अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### अवजड वाहने शहरात येतातच कशी?

शहरातील काही भागांमध्ये सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत अवजड वाहनेही प्रवेश करीत असल्याचे चित्र दिसून येत आहे. एका बाजूला गणेशभक्तांची मोठी गर्दी आणि दुसरीकडे अवजड वाहनांची वर्दळ यांमुळे वाहतूक कोंडी अधिक तीव्र होत आहे. परिणामी, वाहतूक कोंडी शहराचा श्वास गुदमरत आहे. शहरात अवजड वाहनांना प्रवेश करण्यास मनाई असतानाही ही वाहने शहरात कशी येतात, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### सकाळी चहाच्या २० मिनिटे आधी पाणी का प्यावे?

सकाळी उठल्याबरोबर अनेकांना लगेच चहा पिण्याची सवय असते. पण ही सवय आरोग्यासाठी चांगली नाही. रात्रभर आपण ७ ते ८ तास काहीही खात पीत नाही, त्यामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते आणि पोटात आम्लाचे प्रमाण वाढते. अशा रिकाम्या आणि आम्लयुक्त पोटात थेट चहा गेल्यास त्यातील कॅफिन आणि टॅनिन पोटाच्या आतील आवरणाला हानी पोहोचवते. यामुळे छातीत जळजळ, मळमळ, डोकेदुखी आणि दिवसभर थकवा जाणवतो. जर तुम्ही चहा पिण्याच्या २० मिनिटे आधी एक ते दोन ग्लास कोमट पाणी प्यायलात तर याचे आश्चर्यकारक फायदे मिळतात. पहिला फायदा म्हणजे पोटाची आम्लता कमी होते. पाणी हे नैसर्गिकरित्या पोट स्वच्छ करते, त्यामुळे चहाची कडकता आणि गरमी पोटाला सहन होते. दुसरा मोठा फायदा म्हणजे शरीरातील विषारी घटक बाहेर पडतात. रात्रभर शरीरात जमा झालेली घाण लघवी आणि घामावाटे बाहेर टाकण्यासाठी पाणी मदत करते, जर पाणी न पिता चहा प्यायला तर ती घाण शरीरातच फिरत राहते. तिसरा फायदा पचनाशी संबंधित आहे. पाणी प्यायल्याने आतड्यांची हालचाल सुरु होते, पोट साफ होण्यास मदत होते आणि नंतर तुम्ही जे काही खाता पिता ते सहज पचते. चौथा फायदा म्हणजे ऊर्जा वाढते. मेंदूला ७५ टक्के पाण्याची गरज असते, सकाळी पाणी मिळाल्याने मेंदू ताजातवाना होतो, चहामुळे होणारी कृत्रिम जाग कमी होते आणि नैसर्गिक उत्साह दिवसभर टिकतो. तसेच पाणी प्यायल्याने चहाचे व्यसन आपोआप कमी होते कारण पोट थोडे भरलेले वाटते आणि एका कप चहातच समाधान मिळते.

## गणेशोत्सव स्पेशल पाककला

### ड्राय फ्रूट मोदक

**साहित्य :** खजूर ५०० ग्रॅम बिया काढलेला मऊ वाला, बदाम १ वाटी, काजू १ वाटी, पिस्ता अर्धी वाटी, अक्रोड अर्धी वाटी, मनुका अर्धी वाटी, अंजीर ८ ते १० नग, किसलेले सुके खोबरे १ वाटी, खसखस ३ चमचे, वेलची पावडर १ चमचा, जायफळ पावडर पाव चमचा, साजूक तूप ४ चमचे

**कृती :** प्रथम सर्व ड्राय फ्रूट बारीक कापून घ्या. काजू, बदाम, पिस्ता, अक्रोड वेगळे वेगळे ठेवा. खजूर आणि अंजीरचे छोटे छोटे तुकडे करा. एका कढईत २ चमचे तूप गरम करा. त्यात बदाम, काजू, पिस्ता, अक्रोड मध्यम आचेवर २ मिनिटे भाजा. जास्त लाल करू नका. एका ताटात काढा. त्याच कढईत उरलेले २ चमचे तूप टाका. त्यात खसखस, सुके खोबरे १ मिनिट भाजा. सुगंध आला की त्यात कापलेले खजूर, अंजीर आणि मनुका घाला. मंद आचेवर हे मिश्रण ४ ते ५ मिनिटे परता. खजूर मऊ होऊन गोळा व्हायला लागेल. आता गॅस बंद करा. या गरम मिश्रणात भाजलेले सर्व ड्राय फ्रूट, वेलची पावडर, जायफळ पावडर टाका आणि चांगले एकजीव करा. हाताने मळून घ्या म्हणजे सर्व एकत्र बसेल. मिश्रण कोमट असतानाच हाताला थोडे तूप लावा. थोडा गोळा घेऊन मोदकाच्या साच्यात भरा. साचा नसेल तर हाताने लाडू सारखा गोल करून वरून टोक काढून मोदकाचा आकार द्या. सर्व मोदक तयार झाल्यावर १५ मिनिटे फ्रिजमध्ये ठेवा म्हणजे घट्ट होतील. यात साखर किंवा गूळ घालण्याची गरज नाही कारण खजूर गोड असतो.

## वास्तू

### अभ्यास खोली

* अभ्यासाची खोली कधीही बेडरूम मध्ये असू नये. बेडवर बसून अभ्यास केल्याने आळस येतो.
* टेबलासमोर दरवाजा किंवा खिडकी असेल तर लक्ष विचलित होते, त्यामुळे टेबलाची पाठ दरवाज्याला असू नये.
* अभ्यासाच्या खोलीत टीव्ही, मोबाईल, खेळणी ठेवू नका.
* टेबलावर सरस्वतीचा छोटा फोटो उत्तर-पूर्व कोपऱ्यात ठेवा.

## सौंदर्य

प्लास्टिकचा कंगवा फेकून द्या. लाकडी कंगवा वापरा. दिवसातून २ वेळा ५ मिनिटे केस विंचरल्यास डोक्यात रक्ताभिसरण वाढते आणि केस गळणे थांबते.

## सल्ला

* चटणी करताना त्यात १ चमचा भाजलेले शेंगदाणे टाका. चटणी घट्ट होते.
* बेसन मळताना त्यात २ चमचे गरम तेलाचे मोहन टाका. तेल जास्त पित नाही आणि पदार्थ एकदम खुसखुशीत होतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २५ सप्टेंबर २०२६

**अनंत चतुर्दशी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, भाद्रपद शुक्लपक्ष, शततारा ११।२३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज धनलाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** जुने मित्र भेटतील. मन प्रसन्न राहील.

**मिथुन :** कामात यश मिळेल. दिवस चांगला जाईल.

**कर्क :** अचानक पैसे मिळतील. कुटुंबात सुख राहील.

**सिंह :** मोठी बातमी मिळेल. मान सन्मान वाढेल.

**कन्या :** प्रवास घडेल. नवीन ओळखी होतील.

**तूळ :** अडकलेले काम पूर्ण होईल. मनातील इच्छा पूर्ण होईल.

**वृश्चिक :** व्यापारात लाभ होईल. नातेवाईक भेटतील.

**धनु :** आरोग्य उत्तम राहील. आनंद वाढेल.


**मकर :** नोकरीत प्रगती होईल. धनवृद्धी होईल.

**कुंभ :** नवीन संधी मिळेल. भाग्य उजळेल.

**मीन :** कौटुंबिक सुख मिळेल. दिवस लाभदायक ठरेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२५५

सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) शाहरूख खान, काजोल, राणी मुखर्जी यांचा एक चित्रपट ५) प्रिया तेंडुलकरची दूरदर्शनवर गाजलेली एक मराठी मालिका ६) ++ आज और कल (चित्रपटाचे नाव) ७) जुन्या काळातील एक अभिनेत्री – ++ काटकर ८) एक अभिनेत्री – पूजा ++ १२) 'हम आप के है कौन'ची नायिका १३) दम मारो ++ मिट जाये गम (गाणे) १४) +++ दम तक (चित्रपटाचे नाव) १५) धर्मेंद्र, रेखा, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट. १६) बोल ++ बोल (चित्रपटाचे नाव) १७) जुन्या काळातील एक विनोद अभिनेता – राम ++

**उभे शब्द :-** १) अमिताभ बच्चन, शशी कपूर, जया भादुरी, राखी यांचा एक चित्रपट २) अमिताभ बच्चन, विनोद मेहरा, बिंदीया गोस्वामी, संजीवकुमार, तनुजा, प्रेम चोप्रा यांचा एक चित्रपट ३) धर्मेंद्र, रेखा, राजेंद्रनाथ यांचा एक चित्रपट ४) एक ++++ सपनोंका (चित्रपटाचे नाव) ९) ++ ++ देवर दीवाना है राम कुडीयोंको (गाणे) १०) +++ + मजबूर (चित्रपटाचे नाव) ११) +++ प्रेम (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** जो दुसऱ्याशी स्पर्धा करतो तो थकतो, जो स्वतःशी स्पर्धा करतो तो जिंकतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मोबाईल १००% झाल्यावरही चार्जिंगला लावून ठेवल्यास काय होते?

आज प्रत्येकाच्या हातात महागडा स्मार्टफोन आहे. सॅमसंग, आयफोन, वनप्लस सारख्या चांगल्या कंपन्या आपल्या मोबाईलमध्ये खूप प्रगत तंत्रज्ञान देतात. पूर्वीच्या काळी मोबाईल जास्त वेळ चार्जिंगला लावला तर बॅटरीचा स्फोट व्हायचा अशी भीती होती. पण आता तसे होत नाही. तरीही आजही अनेक लोक रात्री झोपताना मोबाईल चार्जिंगला लावतात आणि सकाळी उठल्यावर काढतात. म्हणजे मोबाईल जवळजवळ सहा ते सात तास शंभर टक्के झाल्यावरही वीज घेत राहतो. या सवयीचा नेमका काय परिणाम होतो हे आपण समजून घेणे गरजेचे आहे.

आजच्या प्रत्येक चांगल्या मोबाईलमध्ये दोन प्रकारची सुरक्षा असते. एक म्हणजे चार्जरमध्ये आणि दुसरी म्हणजे मोबाईलच्या आतल्या मदरबोर्डवर. जेव्हा बॅटरी शंभर टक्के होते तेव्हा आतली एक छोटी चिप जिचे नाव चार्जिंग आयसी आहे ती स्वतःहून वीज घेणे बंद करते. त्यामुळे बॅटरीमध्ये जास्त वीज जाणार नाही आणि स्फोट होणार नाही. म्हणूनच तुम्ही रात्रभर मोबाईल लावून ठेवलात तरी सकाळी मोबाईल हातात घेतल्यावर तो फक्त कोमट गरम लागतो, जास्त गरम होत नाही.

खरी समस्या स्फोटाची नाही तर बॅटरीच्या आयुष्याची आहे. प्रत्येक मोबाईलमध्ये लिथियम आयन बॅटरी असते. या बॅटरीचे एक ठराविक आयुष्य असते जे चार्जिंग सायकलमध्ये मोजले जाते. साधारणपणे एका बॅटरीचे पाचशे ते आठशे सायकल आयुष्य असते. जेव्हा आपण मोबाईल शून्य ते शंभर टक्के चार्ज करतो तेव्हा एक सायकल पूर्ण होते. पण जेव्हा आपण मोबाईल शंभर टक्के झाल्यावरही लावून ठेवतो तेव्हा एक वेगळी प्रक्रिया घडते. शंभर टक्के झाल्यावर मोबाईल चार्जिंग बंद करतो पण थोड्या वेळाने बॅटरी आपोआप एक दोन टक्के खाली येते. मग मोबाईल पुन्हा एक दोन टक्के चार्ज करतो. ही प्रक्रिया रात्रभर म्हणजे चार ते पाच तास चालू राहते. याला तांत्रिक भाषेत ट्रिकल चार्जिंग म्हणतात. यामुळे बॅटरी रात्रभर काम करत राहते आणि थोडी थोडी गरम होत राहते. लिथियम बॅटरीला दोन गोष्टी अजिबात आवडत नाहीत एक म्हणजे शंभर टक्के चार्ज आणि दुसरी म्हणजे गरमी. आपण रात्रभर चार्जिंगला लावून ठेवल्याने दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडतात.

जर तुम्ही रोज हीच सवय ठेवली तर सुरुवातीचे तीन चार महिने काहीच फरक जाणवणार नाही. पण सहा महिन्यांनंतर तुम्हाला जाणवेल की जो मोबाईल आधी दिवसभर चालायचा तो आता दुपारीच चाळीस टक्क्यांवर येतो. याचे कारण बॅटरीची क्षमता कमी होणे आहे. नवीन बॅटरीची क्षमता शंभर टक्के असते पण रोज ओव्हरचार्जिंग केल्यामुळे एका वर्षात ती क्षमता ऐंशी टक्क्यांवर येते. म्हणजे तुम्ही शंभर टक्के चार्ज दाखवत असलात तरी प्रत्यक्षात बॅटरीमध्ये ऐंशी टक्केच वीज साठलेली असते. दोन तीन वर्षे असे केल्यास बॅटरी फुगायला लागते. अनेक लोकांच्या मोबाईलचा मागचा भाग उघडतो किंवा स्क्रीन वर येते याचे कारण हेच असते. याशिवाय रात्रभर चार्जर चालू राहिल्याने विजेचा अपव्यय होतो आणि चार्जर लवकर खराब होतो.

यावर उपाय म्हणून कंपन्यांनी आता दोन नवीन सेटिंग दिल्या आहेत. पहिली सेटिंग म्हणजे बॅटरी प्रोटेक्शन लिमिट. तुम्ही सेटिंगमध्ये जाऊन बॅटरी ऑप्शनमध्ये गेलात तर तिथे ऐंशी टक्के लिमिट नावाचा पर्याय दिसेल. तो चालू केला तर मोबाईल ऐंशी टक्क्यांवरच चार्जिंग थांबवेल. ऐंशी टक्के चार्ज हा बॅटरीसाठी सर्वात सुरक्षित आकडा मानला जातो. दुसरी सेटिंग म्हणजे ऑप्टिमाइज्ड चार्जिंग. हे विशेषतः आयफोन आणि सॅमसंगमध्ये असते. हा मोबाईल तुमच्या झोपण्याच्या वेळेचा अभ्यास करतो आणि रात्रभर फक्त ऐंशी टक्केपर्यंतच चार्ज करतो आणि तुम्ही सकाळी उठण्याच्या अर्धा तास आधीच तो शंभर टक्के करतो. यामुळे बॅटरी रात्रभर शंभर टक्क्यावर राहत नाही.

थोडक्यात सांगायचे तर आजच्या चांगल्या कंपनीच्या मोबाईलचा शंभर टक्क्यांवरही चार्जिंगला लावून ठेवल्याने स्फोट होणार नाही हे खरे आहे पण यामुळे बॅटरीचे आयुष्य निम्म्याने कमी होते हेही तितकेच खरे आहे. एक दोन वेळा चुकून रात्रभर राहिला तर काही हरकत नाही पण त्याची रोजची सवय लावू नका. मोबाईल वीस टक्क्याच्या खाली जाण्याआधी चार्जिंगला लावा आणि ऐंशी ते पंचाऐंशी टक्के झाल्यावर काढून घ्या. ओरिजनल चार्जरनेच चार्ज करा आणि चार्जिंग करताना जाड कव्हर काढून ठेवा म्हणजे गरमी बाहेर निघून जाईल. अशी काळजी घेतली तर तुमची बॅटरी तीन ते चार वर्षे अगदी नवीन सारखी चालेल आणि तुम्हाला बॅटरी बदलण्यासाठी तीन चार हजार रुपये खर्च करावे लागणार नाहीत.

## विहिरीतील बेडूक


एका गावात रमेश नावाचा एक तरुण राहत होता. तो खूप हुशार आणि मेहनती होता. त्याच्या शेतात चांगले पीक यायचे. एकदा शहरात गेला असताना त्याच्या मित्रांनी त्याला पहिल्यांदा दारू प्यायला लावली. पहिल्यांदा त्याला खूप वाईट वाटले, डोके दुखले. पण मित्र म्हणाले अरे एकदाच तर आहे, काय होते. हळूहळू रमेशला त्या दारूची सवय लागली. आधी आठवड्यातून एकदा, मग दोनदा, मग रोज. आता त्याला दारूशिवाय झोपच येत नव्हती. त्याने शेताकडे दुर्लक्ष केले. पीक खराब झाले. घरातले पैसे संपले. बायकोने बांगड्या विकल्या. तरीही तो ऐकत नव्हता.

एक दिवस तो पूर्णपणे दारू पिऊन विहिरीजवळ पडला होता. त्याच विहिरीत एक बेडूक राहत होता. तो बेडूक गेली दहा वर्षे त्या विहिरीतच होता. त्याला वाटायचे ही विहीरच सगळे जग आहे. बाहेर किती मोठे सुंदर जग आहे हे त्याला माहितच नव्हते.

रमेशच्या वडिलांनी त्याला उचलून घरी आणले आणि म्हणाले, अरे रमेशा तू त्या विहिरीतल्या बेडकासारखा झाला आहेस. व्यसन हीच तुझी विहीर झाली आहे. तुला वाटते या व्यसनाशिवाय जगच नाही. पण बाहेर बघ, तुझी बायको, तुझी मुले, तुझे शेत तुझी वाट पाहत आहेत. तू या विहिरीतून बाहेर ये. त्या दिवशी रमेशला खूप पश्चाताप झाला. त्याने ठरवले की तो या विहिरीतून बाहेर पडणार. त्याने व्यसनमुक्ती केंद्रात प्रवेश घेतला. सुरुवातीचे पंधरा दिवस खूप त्रास झाला, पण त्याने जिद्द सोडली नाही. आज रमेश पुन्हा आपल्या शेतात आनंदाने काम करतो.

बोध : व्यसन हे विहिरीसारखे असते. सुरुवातीला ते मजेदार वाटते पण हळूहळू ते आपल्याला आत ओढते आणि बाहेरचे सुंदर जग आपल्याला दिसेनासे होते. एकदा सवय लागली की त्यातून बाहेर येणे कठीण होते, पण अशक्य नाही. विहिरीतून बाहेर येण्यासाठी पहिले पाऊल स्वतःलाच उचलावे लागते.

## आत्मशक्ति



### भोगविलास

बाईबलमधील जुन्या नियमात म्हटले आहे, तुम्ही हत्या करु नये. (बहिर्गमन २०-१३) बायबलच्या नव्या नियमांतसुध्दा अहिंसेसंबंधी येशू ख्रिस्तांची शिकवण आहे. कोणीतरी येशू ख्रिस्तावर हल्ला केला. तेव्हा प्रतिक्रिया म्हणून त्यांच्या साथीदाराने हल्लेखोरावर हल्ला केला. तेव्हा येशूनी आपल्या साथीदाराला सांगितले

'आपल्यातलवारीम्यानमध्येठेवा! जेतलवारीचा उपयोग करतात, त्यांचा तलवारींनीच नाश होतो.' (मत्ती २६.५२) क्रोधाचे मोठ्या प्रमाणावर अत्याचारात रुपांतर होते.

लाखो लोकांचे प्राण घेणारी युध्दे आपण २०व्या शतकात पाहिली आहेत. अनावर क्रोध विनाशाच्या गर्तेत ढकलतो आणि मोठ्या कष्टाने त्याचे परिणाम विसरले जातात. बायबलच्या नव्या नियमात आले आहे.तुमच्यात लढाया व भांडणे कोठून आलीत? तुमच्या अंगात मुरलेल्या भोगविलासामुळेच तर नाही ना? तुम्हाला जे हवेसे वाटते ते न मिळाल्याने तुम्ही हत्येला प्रवृत्त होता. तुम्हाला काही मिळाले नाही की तुम्ही द्वेष करता, अन् मग तुमच्यात लढाया होतात, कलह होतात! तुम्हाला ते मिळत नाही, कारण तुम्ही त्याची मागणी करत नाही. जे तुम्ही मागता ते तुम्हाला मिळत नाही. कारण ते मागण्यामागे तुमचा वाईट हेतु असतो. ते तुम्हाला चैनीत, भोगविलासात उडवावयाचे असते.(याकूब ४.१-३)कुणा दुसऱ्या माणसालाच आपल्या क्रोधाच शिकार व्हावे लागते. पण जो हिंसा करतो त्याचे सर्वाधिक नुकसान होते. कर्त्याला त्याच्या कर्माच्या कितीतरी पट अधिक फळ भोगावे लागते.

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### न्यूनगंड

भावंड आवडणार नाही. परिणामी भावा-बहिणींमधल्या वैमनस्याला खूप कमी वयात सुरुवात होते. त्यामुळे त्या दोघांमध्ये समतोल आणि सामंजस्य राखण्यासाठी पहिल्या मुलाची नवीन आलेल्या छोट्या बाळाशी व्यवस्थित ओळख करून देणं ही पालकांची जबाबदारी आहे. तथापि, जर सातत्याने दोन मुलांमध्ये तुलना केली गेली तर पालक त्यांच्या ही न कळत, 'तुझी बहीण/भाऊ तुझ्यापेक्षा चांगली/चांगला आहे,' असाच संदेश देतील. हा संदेश मोठ्या मुलापर्यंत असा पोहोचतो की त्याला वाटतं, कुटुंबात सगळे त्याच्या भावंडावर जास्त प्रेम करतात. ह्या अप्रत्यक्ष संदेशामुळे सततची तुलना त्या बाळासाठी वेदनादायी ठरते.

सुरेश ओबेरॉय : आईवडील भावंडावर जेवढं प्रेम करतात तेवढं आपल्यावर करत नाहीत अशी तक्रार काही मुलं करतात.

शिवानीदीदी : मुलांना असं वाटतं जेव्हा त्यांच्या भावंडाचं कौतुक होतं पण त्याला मात्र ''तू त्याच्यासारखा हुशार नाहीयेस,'' असं सांगितलं जातं. नंतर आयुष्यात जर पालकांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला की त्यांचं दोघांवर समान प्रेम आहे तरी त्या मुलाचा पालकांवर विश्वास बसणार नाही. याचं कारण, आपल्या बरोबर दुजा भाव केला गेला ही भावना तोवर खोलवर रुजलेली असेल.कोणत्याच मुलाच्या बाबतीत तुलना करणं चांगलं नाही कारण त्यामुळे एका मुलात न्यूनगंड निर्माण होईल आणि दुसऱ्यात अति आत्मविश्वास. म्हणूनच दोन्हीही मुलांना वेगवेगळ्या आत्म्यांच्या रूपात पाहणं महत्त्वाचं आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**शिक्षक :** जर भविष्यात १०० रुपये किलो साखर झाली तर काय होईल?

**पप्पू :** मग आम्ही चहा पिणे सोडून देऊ!

**शिक्षक :** आणि साखर १००० रुपये किलो झाली तर?

**पप्पू :** मग आम्ही गोड बोलणे पण सोडून देऊ!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* चंद्रावर उतरलेल्या भारताच्या मोहिमेचे नाव काय?

– चांद्रयान-३

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### संतती प्रतिबंधक उपाय

३) संप्रेरकांचे इंजेक्शन :मेड्रॉक्सीप्रोजेस्टेरॉन ॲसिटेट या संप्रेरकापासून बनलेले इंजेक्शन दर तीन महिन्यातून एकदा अशा स्वरुपात घ्यावे. स्तनपानाच्या काळात देखील हे इंजेक्शन वापरू शकतो. स्तनपानावर याचा दुष्परिणाम होत नाही. फक्त याने पाळी अनियमित होते. कधी कधी काही स्त्रियांमध्ये अंगावरून न जाणे, दोन महिन्यांनी पाळी येणे अशी लक्षणे दिसतात. बीजनिर्मिती होत नसल्यामुळे ही लक्षणे दिसतात; परंतु ही लक्षणे तात्पुरती असतात. इंजेक्शन बंद केल्यानंतर परत नियमितपणे पाळी येण्यास सुरुवात होते. पहिले इंजेक्शन पाळीच्या पाचव्या दिवशी घ्यावे व नंतर येणारे इंजेक्शन दर तीन महिन्यांनी घ्यावे.

४) कॉपर टी :दोन बाळांमध्ये अंतर ठेवायचे असेल, तेव्हा साधारणतः पहिल्या बाळंतपणानंतर हे साधन वापरतात. इंग्रजी 'टी' आकाराप्रमाणे 'कॉपर टी'चा आकार असतो. हे गर्भाशयामध्ये एका पिचकारीच्या साहाय्याने बसविले जाते. 'कॉपर-टी'च्या खालील भागास असलेल्या नायलॉनच्या धाग्याने कॉपर टी गर्भाशयात व्यवस्थित आहे ना, हे समजते. मल्टीलोड, कॉपर-टी अशा वेगवेगळ्या स्वरूपात 'कॉपर-टी' बाजारात मिळतात. कोणती 'कॉपर-टी' बसवावी हे डॉक्टरांच्या सल्ल्याने ठरवावे. कोणास 'कॉपर-टी' बसवू नये? गर्भाशयाच्या मुखाला व्रण असेल,

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये सामाजिक एकतेचा संदेश देत श्री गणेशाचे पर्यावरणपूरक व पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले.

# शाडू मातीच्या गणपतीचे पर्यावरणपूरक विसर्जन; बाप्पाला निरोप देताना विद्यार्थी झाले भावूक


### मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये सामाजिक एकतेचा संदेश

नगर – श्री गणेशाचे पर्यावरणपूरक व पारंपरिक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. सालाबादप्रमाणे शाळेत शाडू मातीचा गणपती बसविण्यात येतो. विद्यार्थ्यांना सण–उत्सवाची माहिती व्हावी यासाठी हा अभिनव उपक्रम मेहेर इंग्लिश स्कूलच्या वतीने घेण्यात येतो.

यावेळी शाळेचे चेअरमन जगदीश झालानी, प्राचार्य प्रा. अनुरीता झगडे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

जगदीश झालानी म्हणाले, गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून सामाजिक एकतेचा संदेश देणारा उत्सव आहे. आम्ही मुद्दाम पीओपी ऐवजी शाडू मातीचा गणपती बसवतो, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पर्यावरण रक्षणाची जाणीव निर्माण व्हावी.

आपले सण, आपली परंपरा आणि पर्यावरण यांचा समतोल कसा राखायचा हे यातून मुलांना शिकायला मिळते. सर्व धर्म, सर्व जातीचे विद्यार्थी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात, हाच खरा सामाजिक एकतेचा संदेश आहे. हेच संस्कार उद्याचे सुजाण नागरिक घडवतील. यावेळी बाप्पाला निरोप देताना शाळेचे विद्यार्थी भावूक झाले होते.



## रद्दीतून साकारली महादेवाची सुंदर गुंफा

तोफखाना भागातील जंगुभाई तालमीमागे शिवानी, केतन, शिवराज, संस्कृती व क्यातम परिवारातील मुलांनी रद्दी व उपलब्ध साहित्याचा कल्पक वापर करून भगवान महादेवाची सुंदर गुंफा साकारली आहे. कमी खर्चात टाकाऊ साहित्याचा उपयोग करून आकर्षक धार्मिक देखावा उभारण्याचा या मुलांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे.

(छाया – ऋषिकेश गुंडला)

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुर्गुणांना बदलून टाकावे

मी दिसलो नसेन का परमेश्वराला ? सर्वत्र व सर्व दूरचे पाहणारा सूर्य हा परमेश्वरा तुझा डोळा. कदाचित रागावला असशील का तू? पण परमेश्वर आणि राग हे एकत्र कसे? कामधेनू दूध म्हणून काय. विष देईल? म्हणूनच, सर्वत्र सुख बरसणे । यालाच चातुर्य संबोधणे।।

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स



डॉ. मधुकर आष्टीकर लिखित नंदादीप प्राजक्ता ९८९०९५६६९५

एकदा स्वामी विवेकानंदांकडे एक भक्त आला. देवाला शिव्या देऊ लागला. तो म्हणाला, देवानं देह देऊन त्यात राग, लोभ, मद, मोह, मत्सर असे नाना दुर्गुण घातले. माणसाचे हे शत्रू जन्मजात निर्माण केले. आता आम्हा मानवांना सुख कुठलं? देवाला हे करणं शोभलं ?

स्वामीजी काही बोलले नाहीत. उठले आणि भक्ताला माझ्याबरोबर चल म्हणाले. दोघेही बागेत गेले. फुलझाडे पाहत फिरू लागले. भक्ताने गुलाबाचे गेंद पाहिले. शेजारी चाफा फुललेला. सुगंध भरलेला. भक्त सुखावला. तेवढ्यात माळी खत घेऊन आला. खताची घाण भक्ताच्या नाकात भरली. त्याने त्याबद्दल नापसंती दर्शविली. स्वामी बोलले नाहीत. नुसते उभे राहिले. माळ्याने ते खत गुलाबाला घातले. चाफ्याच्या मुळाशी पेरले. स्वामीजी माळ्याला म्हणाले, अरे, हे काय करतोस ? गुलाबाच्या मुळात घाणेरडं खत घालतोस? चाफ्याच्या अंगात खताची घाण भरतोस?

माळी म्हणाला, म्हणूनच तर गुलाबाला गेंद लागतात आणि मोहक रंग भरतात. चाफ्याला पिवळीधमक फुलं येतात, ती फुलं सुगंधानं बाग भरून टाकतात.

स्वामीजीं म्हणाले, कमाल आहे या गुलाबाची आणि चाफ्याची. दुर्गंधाचा सुगंध करून टाकतात.

भक्त समजला. ओशाळला. देवाला आपण उगाच शिव्या दिल्या, हे त्याला उमगले. गुलाब आणि चाफा दुर्गंधाला सुगंधात बदलून टाकू शकतात. माणूस दुर्गुणांना असाच सद्गुणात का नाही बदलून टाकत? दुर्गुणांचे खत अंगात मुरवावे. सद्गुण बहरून, फुलून, सुगंधाने भरून यावेत. दुर्गुणांना खतासारखे दाबून टाकावे, खताप्रमाणे सडू द्यावे.

संत मुक्ताबाई म्हणतात, की मृत्यूलाच मुक्तीत बदलून टाकावे. उपाधींनाच समाधीत परिवर्तित करावे. वासनांनाच ध्यानधारणी लावावे.

मृत्यु नाही जेथे। मुक्ती कोणे वाहाणी १।। टाकिल्या उपाधी। तेथेची हे समाधी।। वासना घ्या मनी। लागल्या ध्यानधारणी।।

बा माणसा, आत्मबळ जागव मद, मोह आदी षडि–पूंचे बळ अंगी पचव. बहरून येऊ दे सत्याचा मोहोर. सुटू दे सुगंध शांतीचा, आनंदाचा, समतेचा, मानवतेचा.

संत जनाबाई म्हणतात,
भृंगीचीया अंगी कोणते हो बळ
शरीरे अनाढळ केली आळी

घाणेरड्या अळ्या, पण त्यातून निर्माण होतात भिंगोळ्या. नाही तक्रार भिंगोळीची, अळीच्या घाणेरडेपणाची. उलट त्या घाणीला ती बदलून टाकते. केवढे हे बळ तिच्या अंगी! माणसाने त्या भृंगीपासून भय त्यासी करावे सद्गुणमय ।

मेघाला पुरवठा खारट पाण्याचा, पण नाही त्याची तक्रार. अंगी मुरवतो खारे पाणी आणि करतो वर्षाव अमृतमधुर जीवनाचा. असे प्रावीण्य मेघाचे. ते का नसावे माणसांचे?

– **किशोर गांधी**

# भविष्यात पूर्णपणे डीजे मुक्त सणउत्सव साजरे होतील

### जिल्हा पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, विचार भारतीच्या गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धेचे उद्घाटन



वचार भारतीच्या उत्कृष्ट देखावा स्पर्धेच्या परीक्षणाचे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना पोलीस जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन. समवेत अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, भिंगार कँप पोलीस स्टेशनच्या निरिक्षक जयश्री थोरात, विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर, राजाभाऊ मुळे आदी.

नगर – जिल्ह्याचा पोलीस अधिक्षक म्हणून पदभार घेतला त्याच वेळीस विचार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी डीजेमुक्त सणउत्सव साजरे होण्याची मागणी केली होती. त्यावर पोलीस प्रशासनाने काम करून कडक नियम केल्याने आता मंडळाकडून चांगला प्रतिसाद मिळत असून कमी आवाजात मिरवणुका निघत आहेत. ही सुरवात असून भविष्यात याचा अधिक प्रभाव दिसणार असून पूर्णपणे डीजे मुक्त सणउत्सव साजरे होतील. गणेशोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम व जागृतीच्या विषयांवर देखावे सादर झाल्याने देशसेवेचा संदेश दिला जात आहे. यामुळे येणाऱ्या पिढीचे विचार बदलणार आहेत, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधिक्षक सुदर्शन मुम्मका यांनी केले.

विचार भारतीच्या गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धेच्या परीक्षणाचा शुभारंभ जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते भिंगारच्या दाणे गल्लीतील समर्थ युवा प्रतिष्ठानच्या देखाव्यास्थळी झाले. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, भिंगार कँप पोलीस स्टेशनच्या निरिक्षक जयश्री थोरात, विचार भारतीचे अध्यक्ष सुधीर लांडगे, स्पर्धा प्रमुख रवींद्र बारस्कर, भिंगारचे समन्वयक किशोर कटोरे, ज्येष्ठ मार्गदर्शक राजाभाऊ मुळे, छावणी परिषदेचे सदस्य वसंत राठोड यांच्यासह देखावा स्पर्धेचे परिक्षक, विविध मंडळांचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

प्रास्ताविकात सुधीर लांडगे म्हणाले, गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने, संस्कृतीला अनुसरून व डीजेमुक्त व्हावा यासाठी विचार भारती अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. त्यास पोलीस प्रशासनाचे मोठे सहकार्य लाभत आहेत. त्यामुळे आता काहीप्रमाणात यश येत आहे. भिंगारमध्ये अतिशय उत्कृष्टपणे गणेशोत्सव साजरा होत असून जनजागृती करणारे देखावे सादर झाले आहेत.

तसेच विचार भारतीच्या गणेशोत्सव उत्कृष्ट देखावा स्पर्धेच्या मध्यनगर विभागाच्या परिक्षणाचा शुभारंभ पोलीस उपाधिक्षक दिलीप टिपरसे यांच्याहस्ते नवीपेठे येथे झाले तर सावेडीच्या विभागाचे उद्घाटन उद्योजक अमोल गाडे यांच्या हस्ते झाले. भिंगार येथे समर्थ युवा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार मंडळाचे अध्यक्ष केतन गोवेकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले.

तसेच या मंडळाच्या देखाव्याचे उद्घाटन मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते झाले. रवींद्र बरस्कार यांनी आभार मानले.





गोंधळेगल्ली माळीवाडा येथील राऊत परिवार यांच्या निवासस्थानी 'वारी पंढरपूरची' ही आरस केली आहे. संकल्पना इंजि. यश रामेश्वर राऊत यांची असून, सजावट इंजि. रेणुका आणि ऋतुजा रामेश्वर राऊत यांनी केली आहे.






**गुलमोहर रोडवरील थाडे यांच्या निवासस्थानी आकर्षक गणरायाची सजावट**

अहिल्यानगर येथील गुलमोहर रोडवर सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन थाडे यांच्या निवासस्थानी श्री गणरायाची आकर्षक व देखणी आरास करण्यात आली आहे. पारंपरिक किल्ल्याच्या संकल्पनेवर आधारित सजावट आणि सुंदर विद्युत रोषणाईने गणरायाचे आगमन भक्तिमय वातावरणात साजरे करण्यात आले. निवासस्थान : नितीन थाडे, सेवानिवृत्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, गुलमोहर रोड, अहिल्यानगर.

# अष्टसिद्धींचा रणांगणावर पराभव आणि 'बुद्धी'चा अलौकिक विजय



सर्वांची दृढ समजूत असते की, जर एखाद्याकडे अष्टसिद्धींचे (अलौकिक सामर्थ्य, शक्ती आणि चमत्कारांचे) पाठबळ असेल, तर तो त्रैलोक्यात कधीही पराभूत होऊ शकत नाही.

परंतु, 'श्रीगणेश पुराण' मध्ये एक असा थरारक आणि विचारप्रवृत्त करणारा प्रसंग येतो, जिथे साक्षात आठही महासिद्धी रणांगणावर एका महादैत्यापुढे हतबल ठरतात आणि शेवटी केवळ 'बुद्धी'च्या एका चातुर्याने अशक्य वाटणारा विजय खेचून आणला जातो. शक्तीपेक्षा युक्ती आणि चमत्कारांपेक्षा विवेक कसा श्रेष्ठ ठरतो.

सत्ययुगामध्ये जेव्हा महर्षी कश्यप आणि माता अदिती यांच्या पुत्राच्या रूपात साक्षात परब्रह्माने 'महोत्कट विनायक' अवतार धारण केला होता, त्या काळात त्रैलोक्यात दोन महाभयंकर असुरांची दहशत निर्माण झाली होती – देवांतक आणि नरांतक!

या दोघांनी कठोर तप करून महादेवांकडून अफाट शक्ती आणि अजेय असण्याचे वरदान मिळवले होते. देवांतक हा युद्धकलेत, अस्त्रविद्येत आणि मायावी तंत्रात अत्यंत निपुण होता. त्याने आपल्या अथांग सैन्यासह साक्षात पवित्र काशी नगरीला वेढा घातला. देव, गंधर्व, यक्ष आणि ऋषीमुनी त्याच्या दहशतीने थरथर कापत होते. धर्म आणि संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी साक्षात महोत्कट विनायकांनी देवांतकाविरुद्ध धर्मयुद्धाची घोषणा केली.

युद्धाचा भडका उडाला. असुरांचे पारडे जड होत असल्याचे पाहून विनायकांच्या सैन्यातून साक्षात अष्टसिद्धी या केवळ अमूर्त संकल्पना म्हणून नव्हे, तर प्रत्यक्ष दिव्य, शस्त्रसज्ज स्त्री–योद्ध्यांचे रूप धारण करून रणांगणावर उतरल्या.

या आठ सिद्धी म्हणजे योगशास्त्रातील सर्वोच्च शक्ती होत्या :

अणिमा– क्षणात अणूपेक्षाही सूक्ष्म होण्याचे सामर्थ्य.

महिमा– इच्छेनुसार पर्वतासारखे विशाल आणि महाकाय रूप घेण्याची ताकद.

गरिमा–शरीराचे वजन अनंत पटींनी वाढवून भूमीलाही झुकवण्याची शक्ती.

लघिमा–पिसासारखे हलके होऊन हवेत संचार करण्याचे कसब.

प्राप्ती –कोणतीही अदृश्य किंवा दुर्लभ वस्तू क्षणात हस्तगत करण्याची क्षमता.

प्राकाम्य– निसर्गाच्या हर नियमाला वाकवून इच्छित साध्य करण्याचे सामर्थ्य.

ईशित्व–सर्वांवर पूर्ण अधिपत्य गाजवण्याची ताकद.

वशित्व–शत्रूचे मन आणि चित्त स्वतःच्या नियंत्रणात आणण्याचे संमोहन.

या आठही महाशक्तींनी रणांगणात पाऊल ठेवताच असुरांच्या सैन्यात हाहाकार माजला. अणिमेने सूक्ष्म रूप घेऊन असुरांची शस्त्रे निकामी केली; महिमेने महाकाय पावले टाकून दैत्यांचे रथ चक्काचूर केले; गरिमेने स्वतःचे वजन अथांग वाढवून असुरांच्या बलाढ्य तुकड्या जमिनीखाली गाडल्या. तीन दिवस हा तुंबळ संग्राम चालला. सिद्धींच्या चमत्कारी शक्तींपुढे असुरांचे सैन्य पळता भुईथोडे झाले.

आपल्या सैन्याची दैना पाहून महादैत्य देवांतक स्वतः प्रचंड गर्जना करत रणांगणात उतरला.

देवांतक हा केवळ वरदानांनी युक्त नव्हता, तर तो क्रूर, तामसी आणि हिंसक वास्तवाचा कळस होता. सिद्धींनी एकत्र येऊन देवांतकावर सर्व बाजूंनी हल्ला चढवला. गरिमेने त्याला आपल्या अथांग वजनाने दाबून मारण्याचा प्रयत्न केला, महिमेने विशाल हातांनी प्रहार केले, वशित्वाने त्याचे मन वश करण्याचा प्रयत्न केला.

परंतु, देवांतकाने आपल्या तामसी संतापाने आणि मायावी शस्त्रांच्या भडक्याने सिद्धींचे सर्व योगिक चमत्कार एकापाठोपाठ निष्प्रभ केले. तांत्रिक आणि शारीरिक शक्ती ही हिंसक क्रौर्यापुढे मर्यादा दाखवू लागली. देवांतकाच्या एकामागून एक होणाऱ्या भीषण प्रहारांनी आठही सिद्धींचे तेज क्षीण झाले. ज्या शक्तींनी आजवर साऱ्या विश्वाला विस्मयचकित केले होते, त्या आठही सिद्धी देवांतकापुढे हतबल झाल्या. रणांगणावर त्यांचा पराभव झाला आणि त्यांना माघार घेऊन थेट श्रीविनायकांच्या चरणी परतावे लागले.

रणांगणावर घडलेला हा प्रसंग अभूतपूर्व होता. अष्टसिद्धी खाली मान घालून श्रीविनायकांसमोर उभ्या राहिल्या.

त्याच क्षणी विनायकांच्या सान्निध्यातून साक्षात 'बुद्धी' पुढे आली. तिने प्रभूंच्या चरणी नमन केले आणि म्हणाली, प्रभू, सिद्धींकडे अफाट ताकद आहे, पण जिथे सारासार विचार आणि योग्य रणनीतीचा अभाव असतो, तिथे केवळ सामर्थ्य असूनही विजय मिळत नाही. केवळ शक्तीने ज्याचा पराभव होत नाही, त्याचा विनाश केवळ विवेकानेच शक्य आहे. मला रणांगणावर जाण्याची आज्ञा द्यावी.

श्रीविनायकांनी मंद स्मितहास्य करून बुद्धीला अनुमती दिली. बुद्धी रणांगणात उतरली. तिच्या हातात कोणतीही संहारक अस्त्रे नव्हती; तिच्या चेहऱ्यावर शांत, गंभीर आणि अचूक योजनेचे तेज होते.

बुद्धीने रणांगणावर पाऊल ठेवताच असुरांच्या अंतर्मनात एक सूक्ष्म कंप निर्माण झाला. बुद्धीने आपल्या प्रभावाने असुरांच्या छावणीत आणि देवांतकाच्या मेंदूत 'भ्रम, संशय आणि कलह' निर्माण केला. असुरांना आपल्याच सहकाऱ्यांमध्ये शत्रू दिसू लागले. त्यांची विचारशक्ती पूर्णपणे स्तब्ध झाली. कोणावर बाण चालवावा, सैन्याची रचना कशी करावी आणि स्वतःचा बचाव कसा करावा, याचा त्यांना विसर पडला.

ज्या देवांतकाला आठ सिद्धींच्या विशाल रूपाची भीती वाटली नव्हती, तो बुद्धीच्या एका चालीने स्वतःच्याच सैन्याच्या गोंधळात अडकला. मानसिक संतुलन बिघडलेला देवांतक भयभीत झाला आणि अजेय समजला जाणारा तो दैत्य रणांगणातून पळ काढण्यास भाग पडला.

अणिमा, महिमा किंवा गरिमा या सिद्धी म्हणजे आजच्या काळातील संपत्ती, सत्ता, शारीरिक ताकद किंवा कौशल्ये आहेत. माणसाकडे भरपूर पैसा किंवा पद असले, तरी तो संकटात जिंकू शकेलच असे नाही. कारण शक्ती आंधळी असते; तिला डोळे नसतात.

शक्तीला योग्य दिशा देण्याचे काम 'बुद्धी' करते. जेव्हा संकटे डोंगराएवढी मोठी असतात, तेव्हा तिथे बळाचा वापर करून चालत नाही; तिथे शांत चित्ताने, युक्तीने आणि प्रसंगावधानाने काम करावे लागते. म्हणूनच अष्टसिद्धी जिथे हरल्या, तिथे एकट्या बुद्धीने युद्ध जिंकले.

आपल्या संस्कृतीत गणपती बाप्पाला 'ऋद्धी–सिद्धी–बुद्धी प्रदाता' का म्हणतात, याचे उत्तर या कथेत आहे. बाप्पा आपल्याला फक्त साधनसामग्री (सिद्धी) देत नाहीत, तर त्या साधनांचा योग्य वेळी कसा वापर करावा याचा 'विवेक' (बुद्धी) देतात.



**रमेश देशपांडे**
९४२३७९३२२६

# काशिद कुटुंबाचा 'पंचधातू श्रीगणेशा'चा अनोखा संकल्प

नगर – गणेशोत्सव म्हणजे श्रद्धा, भक्ती, आनंद आणि उत्साहाचा सण. दरवर्षी घराघरात गणरायाचे भक्तिभावाने स्वागत केले जाते. मात्र, या भक्तीमय उत्सवाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत अहिल्यानगर येथील कृष्णा मोहनीराज काशिद यांनी गेल्या वर्षापासून एक आगळावेगळा आणि पर्यावरणपूरक संकल्प केला आहे.



दरवर्षी गणेशमूर्तीचे विसर्जन करताना जलस्रोतांवर होणारा परिणाम, मूर्तीच्या साहित्यामुळे होणारे प्रदूषण तसेच निसर्गाची होणारी हानी लक्षात घेऊन काशिद यांनी याबाबत वेगळा विचार करण्याचे ठरवले. श्रद्धा जपूया, पण त्यासोबत निसर्गही जपूया या विचारातून दरवर्षी नवीन मूर्ती आणण्याऐवजी पंचधातूची श्रीगणेशमूर्ती घरी स्थापन करण्याचा त्यांनी संकल्प केला.

गेल्या वर्षापासून पंचधातूच्या गणरायाची स्थापना करून काशिद कुटुंबाने भक्ती आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर मेळ साधला आहे. या उपक्रमामुळे दरवर्षी नवीन मूर्ती तयार करून तिचे विसर्जन करण्याची गरज कमी होते आणि पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेशही समाजापर्यंत पोहोचतो.

प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा पर्यावरणावर विपरीत परिणाम करणाऱ्या इतर साहित्याच्या मूर्तीपेक्षा कायमस्वरूपी पंचधातूच्या गणेशमूर्तीची स्थापना करण्याचा हा विचार श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक जबाबदारी यांचा सुंदर संगम आहे. गणरायाची भक्ती करताना निसर्गाचेही संवर्धन व्हावे, हा सकारात्मक संदेश या संकल्पनेतून दिला जात आहे.

आजच्या काळात सण–उत्सव साजरे करताना आपल्या परंपरांचे जतन करण्यासोबतच पर्यावरणाची काळजी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. काशिद कुटुंबाने केलेला हा छोटासा संकल्प पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबू शकतो. आणि त्या माध्यमातून समाजात एक आगळावेगळा उत्सवही साजरा करूया आणि पर्यावरणही वाचवूया असा प्रेरणादायी संदेश जाईल.

# स्कायब्रिजमध्ये गणेशोत्सवाचा जल्लोष

### भक्ती, उत्साह, खेळ आणि स्नेहाने फुलला उत्सव; विविध कार्यक्रमांना प्रतिसाद

नगर – गणेशोत्सव म्हणजे केवळ पूजा आणि आरती नव्हे, तर एकत्र येण्याचा, आनंद वाटून घेण्याचा आणि नाती अधिक घट्ट करण्याचा उत्सव–याचा सुंदर अनुभव सध्या स्कायब्रिजमध्ये पाहायला मिळत आहे. गणेशोत्सवानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात दररोज उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

१३ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या उत्सवात फनफेअर ऑक्शनने रंगत आणली. १४ सप्टेंबर रोजी गणेशस्थापना विधिवत करण्यात आली आणि त्यानंतर दररोजच्या आरतीने उत्सवाला भक्तिमय वातावरणाची जोड मिळाली.

१५ सप्टेंबर रोजी नियमित आरती तर १६ सप्टेंबर रोजी सामूहिक क्षमापना व सामूहिक भावनिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. धार्मिक श्रद्धेसोबतच एकमेकांप्रती असलेला स्नेह आणि आपुलकी या उपक्रमातून अनुभवायला मिळाली.

१७ सप्टेंबरला संगीत खुर्ची आणि १८ सप्टेंबरला ग्रुप गेम्स् आयोजित करण्यात आले. लहान मुले, तरुण, महिला तसेच ज्येष्ठ सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतल्याने परिसरात हास्य, उत्साह आणि आनंदाची लाट पसरली.

### ग्रॅण्ड फन फेअरने वाढवली उत्सवाची रंगत

१९ सप्टेंबर रोजी ग्रॅण्ड फन फेअरचे आयोजन करण्यात आले. विविध खेळ, मनोरंजन आणि कुटुंबीयांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे हा दिवस विशेष ठरला. स्कायब्रिजमधील कुटुंबांनी एकत्रितपणे उत्सवाचा आनंद घेतला आणि अनेक सुंदर आठवणी निर्माण केल्या.



२० सप्टेंबरला सत्यनारायण पूजेने भक्तीचा सुंदर संगम – गणेशोत्सवातील आणखी एक भावपूर्ण क्षण म्हणजे २० सप्टेंबर रोजी स्कायब्रिज सदस्य सिद्धार्थ लोढा आणि ऋतुजा लोढा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली सत्यनारायण पूजा.

सायंकाळी ४ वाजता विधिवत सत्यनारायण पूजा पार पडली. मंत्रोच्चार, पूजा आणि आरतीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. स्कायब्रिज परिवार मधील सदस्यांनी मोठ्या श्रद्धेने या पूजेत सहभाग घेतला. यानंतर सायंकाळी ७ वाजल्यापासून स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. विशेष म्हणजे, किडस् ग्रुपकडून तंबोला गेम्स्चे आयोजन करण्यात आल्याने लहान मुलांचाही उत्साह द्विगुणित झाला. पूजा, प्रसाद, स्नेहभोजन आणि खेळ अशा सर्वांगसुंदर वातावरणात २० सप्टेंबरचा दिवस संस्मरणीय ठरला. व/ इथे प्रत्येक दिवस फक्त कार्यक्रम नसतो तो एक अनुभव असतो!

स्कायब्रिज मधील गणेशोत्सवाची सर्वात विशेष बाब म्हणजे प्रत्येक कार्यक्रमात रहिवाशांचा सामूहिक सहभाग. कोणाचा वाढदिवस असो, धार्मिक कार्यक्रम असो किंवा गणेशोत्सवातील एखादा उपक्रम–आनंद एकट्याचा न राहता तो संपूर्ण स्कायब्रिज परिवारचा होतो. लहान मुलांचा निरागस उत्साह, तरुणाईचा सहभाग, महिलांची सक्रिय उपस्थिती आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन यामुळे येथे पिढ्यांना जोडणारे एक सुंदर सामाजिक वातावरण निर्माण झाले आहे.

गणेशोत्सवातील प्रत्येक दिवस स्कायब्रिजच्या सामूहिक जीवनाची एक नवी बाजू दाखवत आहे–कुठे भक्ती, कुठे खेळ, कुठे हास्य, कुठे मैत्री आणि कुठे कुटुंबासोबत घालवलेले सुंदर क्षण.

घर सुंदर असते; पण त्या घराभोवती माणसांची सुंदर नाती असतील, तरच जीवन अधिक सुंदर होते. स्कायब्रिज मधील सध्याचे उत्सवी वातावरण हीच भावना अधोरेखित करत आहे. येथे उत्सव केवळ साजरे होत नाहीत, तर ते जगले जातात आणि त्यांच्या आठवणी निर्माण केल्या जातात.

१३ ते २० सप्टेंबरदरम्यान झालेल्या विविध कार्यक्रमांनी स्कायब्रिज परिसराला जणू भक्ती, मैत्री आणि आनंदाचे एक मोठे कुटुंब बनवले आहे. आगामी कार्यक्रमांची उत्सुकता आता सर्व सदस्यांमध्ये वाढली असून, गणेशोत्सवाची ही आनंदयात्रा आणखी संस्मरणीय होण्याची अपेक्षा आहे.

स्कायब्रिज परिवार – जिथे गणेशोत्सव म्हणजे भक्तीबरोबरच मैत्री, आपुलकी आणि असंख्य सुंदर आठवणी! गणपती बाप्पा मोरया!

# आनंदतीर्थ समवशरण येथे २६ सप्टेंबर रोजी कविता गांधी यांच्या ३१ उपवासांचे पच्चक्खाण



नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासात भाविक अतिशय श्रद्धेने धर्म साधना, तपस्या, उपवास करत आहेत. आत्मोन्नतीची अनुभूती देणारा चातुर्मास सर्वांना सकारात्मक ऊर्जा देणारा ठरत आहे. भिंगार येथील कविता प्रफुल्ल गांधी (करंजीवाले) यांनी या अनुष्ठानात सहभागी होत मासखमण (३१ उपवास) केले आहेत. त्यांच्या तपस्येचे पच्चक्खाण २६ सप्टेंबरला सकाळी ८.३० वाजता होणार आहे, अशी माहिती समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कोषाध्यक्ष विलास कटारिया यांनी दिली.

श्राविका कविता गांधी यांनी चातुर्मासात अतिशय श्रद्धेने ३१ दिवसांचे उपवास केले. त्यांचे पच्चक्खाण महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात होणार आहे. यानिमित्त आनंदधाम ते आनंदतीर्थ समवशरण पर्यंत वरघोडा निघेल. तसेच तपस्वींसाठी पुणे येथील जैन गायक तरूण मोदी यांचा भावा कार्यक्रम होणार आहे. आनंदतीर्थ समवशरण येथे सध्या पुच्छिंसुणं संपुट कार्यक्रमही उत्साहात सुरू आहे. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी उद्योगपती आणि अहिल्यानगरचे तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवार आहे.

कार्यक्रमास भाविकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, कमिटी सदस्यांनी केले आहे.

# लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्थेला 'सहकार समृद्ध पुरस्कार'

## अडचणींवर मात करत 'उर्जित अवस्थे'कडे वाटचाल; चेअरमन सौ. मिनल बोरा यांच्या नेतृत्वाचे फेडरेशनकडून कौतुक



लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांना नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि., अहिल्यानगर यांच्या वतीने 'सहकार समृद्ध पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. पुरस्कार स्विकारताना चेअरमन चेअरमन सौ. मिनल ईश्वर बोरा आदी.

नगर – सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, पारदर्शक व विश्वासार्ह कारभार, सामाजिक बांधीलकी आणि संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीची दखल घेत लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांना नाशिक विभागीय नागरी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांचे फेडरेशन लि., अहिल्यानगर यांच्या वतीने 'सहकार समृद्ध पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. संस्थेच्या अडचणीच्या काळातून सक्षमपणे मार्ग काढत पुन्हा संस्थेला उर्जित अवस्थेत आणून पुरस्काराच्या या टप्प्यापर्यंत पोहोचविण्याच्या वाटचालीचे विशेष कौतुक यावेळी करण्यात आले.

२२ सप्टेंबर रोजी झालेल्या या गौरव सोहळ्यात महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा, सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे, अनिरुद्ध देवचक्के, राजीव गांधी पतसंस्थेचे अध्यक्ष उद्धव दुसुंगे, ज्ञानदेव पांडुळे, सुनील लोटके आदी उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत नाशिक विभागीय फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांच्या हस्ते लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेच्या वतीने चेअरमन सौ. मिनल ईश्वर बोरा, संचालक संजय मुद्गल आणि व्यवस्थापक संतोष वल्ली यांनी पुरस्कार स्वीकारला.

वसंत लोढा यांनी लक्ष्मीनारायण पतसंस्थेच्या वाटचालीचे विशेष कौतुक केले. अलीकडच्या काळात संस्थेला काही अडचणींचा सामना करावा लागला होता. मात्र, अशा परिस्थितीत एक महिला काय करू शकते आणि महिला चेअरमन आपल्या नेतृत्वातून संस्थेला पुन्हा कशा प्रकारे उर्जित अवस्थेत आणू शकते, याचे लक्ष्मीनारायण पतसंस्था हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. सौ. मिनल बोरा यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने केलेली उल्लेखनीय कामगिरी, प्रतिकूल परिस्थितीतून केलेली दमदार पुनरागमनाची वाटचाल आणि आज 'सहकार समृद्ध पुरस्कार' स्वीकारण्यापर्यंत संस्थेला पोहोचविणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असल्याचे लोढा यांनी सांगितले.


पुरस्कार स्वीकारल्यानंतर चेअरमन सौ. मिनल बोरा यांनी हा सन्मान स्वतःपुरता किंवा केवळ संचालक मंडळापुरता मर्यादित नसून, लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्थेच्या सभासदांनी संस्थेवर दाखविलेल्या विश्वासाला समर्पित असल्याचे सांगितले. अडचणीच्या काळातही सभासदांनी संस्थेवर विश्वास कायम ठेवला आणि संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी वर्गाने त्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी एकजुटीने केलेल्या प्रयत्नांमुळे संस्थेला पुन्हा उर्जित अवस्थेत आणणे शक्य झाले. त्यामुळे 'हा पुरस्कार संस्थेच्या सभासदांच्या विश्वासाला समर्पित आहे', अशी भावना सौ. बोरा यांनी व्यक्त केली.

लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था ही सभासदांचा विश्वास, पारदर्शक व्यवहार, आर्थिक शिस्त, उत्तम सेवा आणि सामाजिक बांधीलकी या मूल्यांच्या आधारावर कार्यरत असून, संस्थेच्या प्रगतीमध्ये संचालक मंडळासोबत अधिकारी व कर्मचारी वर्गाचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. चेअरमन सौ. मिनल बोरा यांच्या समवेत व्हा. चेअरमन सौ. स्वाती महेश गुंदेचा, कार्यकारी संचालक नरेंद्र बागडे, संचालक गणेश मानकर, विजय जुंदरे, संजय मुद्गल, सुनील पावले, प्रतीक बोगावत, उमेश कोदे आणि डॉ. दिलीप बागल, तसेच स्वीकृत संचालक ॲड. अभिजीत कोठारी आणि सी.ए. विजय राठोड यांचे संस्थेच्या वाटचालीत योगदान आहे.

संस्थेचे व्यवस्थापक संतोष वल्ली, सहव्यवस्थापक श्रीमती छाया साळी तसेच सेवक वर्गातील अमृता कांबळे, वैष्णवी टोकसिया आणि सौरभ मानकर यांच्या योगदानाचाही या यशामध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

या सोहळ्यास विविध सहकारी संस्था व पतसंस्थांचे अध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी, सभासद उपस्थित होते.

## वंदू गणेशा...



रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर,
माणिकचौक, अ.नगर
मो.७९७२९८९७८०

# अहिल्यानगर शहरामध्ये २५ सप्टेंबर रोजी रंगणार 'महाराष्ट्राची लोकधारा' लोककलेचा सांस्कृतिक सोहळा




नगर – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने तसेच 'गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा' मिळाल्यानिमित्त 'महाराष्ट्राची लोकधारा' या भव्य लोककला कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता माऊली सभागृह, अहिल्यानगर येथे हा कार्यक्रम होणार असून, कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य आहे.

सुनील लुंगे प्रस्तुत 'पुष्पराज थिएटर्स' निर्मित या कार्यक्रमामध्ये तब्बल ५० कलावंत महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविणार आहेत. गण, गवळण, मुजरा, लावणी, कोळी गीत, लोकगीत, शाहिरी गीत, महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांवर आधारित लोकनृत्य अशा विविध लोककलांचे सादरीकरण यावेळी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागांतील पारंपरिक लोककला, लोकसंगीत आणि लोकनृत्य यांचा समृद्ध वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, अहिल्यानगर तसेच आशिष शेलार, मंत्री, सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन व मुंबई शहराचे पालकमंत्री यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रशांत संगीत कैलास खेडेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच डॉ. पंकज आशिया, जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे.

अहिल्यानगरमधील नागरिकांनी व रसिकांनी या विनामूल्य लोककला महोत्सवाचा आवर्जून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मोहनलाल मानधना परिवारातर्फे 'जैन तपस्वी अनुमोदना कार्यक्रम'



मोहनलाल पराग मानधना परिवारातर्फे 'जैन तपस्वी अनुमोदना कार्यक्रम' उत्साहात झाला.

नगर – श्री रामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल आणि मोहनलाल रामअवतार मानधना ज्युनिअर कॉलेज येथील सेठ रामनाथ धूत ऑडिटोरियम हॉल येथे जैन तपस्वी अनुमोदना कार्यक्रम भक्तिपूर्ण वातावरणात उत्साहात झाला. तपस्या, त्याग, आत्म संयम आणि दृढ संकल्पाचे पालन करणाऱ्या ज्युनियर कॉलेजच्या जैन तपस्वी विद्यार्थ्यांचा गौरव, अनुमोदन व उत्साहवर्धन करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी तपस्वी विद्यार्थ्यांना आशीर्वाद देण्यासाठी व त्यांचे अभिनंदन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्रीगोपाल धूत, संस्थेचे उपाध्यक्ष व स्कूल एज्युकेशन कमिटीचे चेअरमन नंदकुमार झंवर, उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, उपाध्यक्ष राजेश झंवर, जॉइंट सेक्रेटरी बजरंग दरक, कमिटी सदस्य पुरुषोत्तम पटेल व रविंद्र गुजराती यांची प्रमुख उपस्थिती होती. मानधना परिवारातर्फे या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

जैन परंपरेत तप, तप, आराधना, साधनेला अतिशय महत्व आहे. विशेषतः चातुर्मास काळात आत्मोन्नतीसाठी विशेष तप साधना केली जाते. नगरमध्ये सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासानिमित्त भाविक तपस्या करत आहेत. यात शालेय विद्यार्थीही सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे धर्माचरण करत आहेत. या तपस्येतून तीर्थंकर भगवान महावीर यांच्या महान तत्वज्ञानाचा अंगिकार करण्याचा प्रयत्न होत असतो. जे जीवन जगताना प्रत्येकासाठी दिशादर्शक असते.

या प्रसंगी ४६ तपस्वी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना भेटवस्तू तसेच रोख पारितोषिक देऊन त्यांच्या तपश्चर्येचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या प्रेरणादायी साधनेत त्यांच्या पालकांचेही महत्त्वपूर्ण योगदान असून, तपस्वी विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालकही या कार्यक्रमास उपस्थित होते.

शाळेच्या प्राचार्या गगनप्रीत वाधवा व उपप्राचार्या संपदा देशपांडे यांनी तपस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच अपराईज ट्यूटोरियल्सचे उमेश डोडेजा यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा व सदिच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये जैन धर्मातील प्रमुख मूल्ये जसे की संयम, शिस्त, आत्मनियंत्रण, त्याग आणि आध्यात्मिक मूल्यांची जपणूक करण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये वक्तृत्वचा रंगला उत्स्फूर्त महासंग्राम

## सेठ नंदलाल धूत स्कूलने पटकाविला फिरता करंडक; पार्थ जरे ठरला वक्तृत्व स्पर्धेचा मानकरी



अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेली उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा पार पडली.

नगर – अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये संस्थेचे संस्थापक स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेली उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा पार पडली. विविध शाळांमधून सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावीपणे विचार मांडत आपल्या वक्तृत्वाची छाप उमटवली. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादामुळे स्पर्धेला चांगली रंगत आली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया व स्व. शांतीकुमारजी फिरोदिया यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. रेणुका पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर करून स्वागत केले. या स्पर्धेसाठी माणिकताई करंदीकर विद्यालयाच्या शर्मिला कुलकर्णी तसेच न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या प्रतिभा पवार यांनी परीक्षक व प्रमुख पाहुण्या म्हणून काम पाहिले. संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी मार्गदर्शन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी दिलेल्या विविध विषयांवर अत्यंत आत्मविश्वासाने आणि प्रभावीपणे आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातील उत्स्फूर्तता, विषयाची मांडणी, भाषेवरील प्रभुत्व आणि विचारांची स्पष्टता यांचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले. तंत्रज्ञानाच्या युगातही विद्यार्थ्यांनी स्वतःचे स्वतंत्र विचार प्रभावीपणे मांडण्याची क्षमता जोपासले याचे दर्शन या स्पर्धेतून घडल्याचे परीक्षकांनी नमूद केले.

यावर्षीच्या वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक विजेतेपदाचा फिरता करंडक सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलने पटकाविला. वैयक्तिक गटात समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडीचा विद्यार्थी पार्थ शिवनाथ जरे याने प्रथम क्रमांक मिळविला. सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूलच्या आरुष प्रसाद बेडेकर याने द्वितीय, तर अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूलच्या अंश प्रितेश गुगळे याने तृतीय क्रमांक पटकाविला. उत्तेजनार्थ पारितोषिकांमध्ये सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलची स्वरा आदित्य येवलेकर आणि श्री इंग्लिश मीडियम स्कूलचा आर्यन अरुण उगले यांनी यश मिळविले.

शाळेचे प्राचार्य प्रभाकर भाबड यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजनबद्ध आयोजन करण्यात आले. उपप्राचार्या कविता सुरतवाला, माध्यमिक विभाग प्रमुख वैशाली वाघ, उच्च प्राथमिक विभाग प्रमुख रेखा शर्मा, प्राथमिक विभाग प्रमुख अर्चना मुंडिवाले आणि पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख ज्योती सुद्रिक यांच्यासह शाळेतील शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

विजेत्या स्पर्धकांचे संस्थेचे सहकार्यवाह गौरव फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा आणि खजिनदार प्रकाश गांधी यांनी अभिनंदन केले. सूत्रसंचालन शिल्पा कमलकर यांनी केले. परिचय संध्या बोरसे यांनी करून दिला. स्पर्धेची नियमावली सांगून कल्पना लोंढे यांनी निकाल जाहीर केला. रेणुका मुळे यांनी आभार मानले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २८ सप्टेंबर रोजी बालरोग व थॅलेसेमिया मोफत तपासणी शिबिर

नगर – जैन सोशल फेडरेशनद्वारा संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे २८ सप्टेंबरला सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत बालरोग व थॅलेसेमिया तपासणी आणि सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबीर होणार आहे. शिबिरात सोनोग्राफी, रक्त, लघवी व इतर तपासण्या ५० टक्के सवलतीच्या दरात केल्या जाणार आहेत. नवजात शिशु व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखीलकुमार गुट्टे, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. सचिन तोडमल, डॉ.वैभवी वंजारे, डॉ.दिपी अग्रवाल तसेच थॅलेसिमिया तज्ज्ञ डॉ. लिझा बलसारा रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील.

हॉस्पिटलमध्ये नवजात शिशु व बालरोगावर प्रभावी उपचार सुविधा उपलब्ध आहेत. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने शस्त्रक्रियाही करण्यात येतात. याठिकाणी २६ बेडचे अद्ययावत एन.आय.सी.यु., नवजात बाळाच्या श्वासोच्छ्वासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसन दाह), नवजात कावीळीसाठी फोटो थेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवांशिक व जन्मजात आजारांचे निदान, लहान मुलांचे २ डी इको, एक्स रे, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तपासणी मशीन, २४ तास तज्ज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत. महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शस्त्रक्रिया केल्या जातील. २ ते १२ वर्षांच्या मुलांसाठी अद्ययावत व स्वतंत्र थॅलेसेमिया विभाग कार्यरत आहे.

शिबिरात सरकमसीजन (सुंता), हायड्रोसील, अॅपेंडिक्स, जांघेचा हर्निया, बेंबीचा हर्निया शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जातील. यासाठी औषध खर्च वेगळा असेल. उपचार सुविधांचा जास्तीत जास्त रूग्णांना लाभ मिळावा यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये (संपर्क : मो. ९४०५२ ७१८७८), सिटी स्कॅन १२५० रूपये (संपर्क : मो. ९४०४२९९९११), एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. रात्री १ ते पहाटे ५ यावेळेत एम.आर.आय. केल्यास ७५० रूपयांची सूट दिली जाईल. (संपर्क : मो. ९४०४२९७४११). २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या पॅथोलॉजी लॅबच्यावतीने ब्लड सँम्पल घरी येऊनही घेतले जाते. त्यामुळे रूग्णांच्या वेळेत बचत होते. (होम ब्लड सँम्पलसाठी संपर्क : मो. ९३७३८०७८४२). शिबिराचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६.



जायंट्स सप्ताह निमित्त पांजरपोळ गोरक्षण संस्थेत चारा व औषध वाटप करण्यात आले.

# जायंट्स सप्ताह निमित्त पांजरपोळ गोरक्षण संस्थेत चारा व औषध वाटप

नगर – जायंट्स वेलफेअर फेडरेशन 2B च्या जायंट्स सप्ताह निमित्त जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि सुखकर्ता तरुण मित्र मंडळ, सौरभ कॉम्प्लेक्स यांच्या संयुक्त विद्यमाने अरणगाव रोडवरील पांजरपोळ गोरक्षण संस्थेत गाईंसाठी हिरवा चारा व औषध वाटपाचा सेवाभावी उपक्रम उत्साहात झाला.

यावेळी ५ क्विंटल हिरवा चारा तसेच आवश्यक औषधे व गोमाता संगोपनासाठी लागणारे साहित्य वाटप करण्यात आले. उपस्थितांनी गोशाळेची पाहणी करून गोवंशाच्या आरोग्याची माहिती घेतली. या कार्यक्रमासाठी जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगरचे विशेष समिती सदस्य संजय गुगळे, अध्यक्ष राजेंद्र कटा रीया, अभय मथा, अनिल गांधी, दर्शन गुगळे, सचिव अमित मुनोत, तसेच सुखकर्ता तरुण मित्र मंडळाचे सदस्य हेमन पालवे, आदित्य गांधी, समर्थ जोशी, सक्षम पाडळे, गोविंद चौहान यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रोफेसर कॉलनी चौकातील खाद्यपदार्थ स्टॉलवर अन्न व औषध प्रशासनाची धाड

## अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी केली खाद्यपदार्थ व स्वच्छतेची तपासणी



प्रोफेसर कॉलनी चौकातील खाद्यपदार्थांच्या स्टॉलची स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी करताना अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार व इतर. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – सावेडीतील प्रोफेसर कॉलनी चौकातील विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉलची स्वच्छता व खाद्यपदार्थांची तपासणी अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांच्या पथकाने केली. खाद्यपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता तसेच किचनमधील स्वच्छतेची पाहणी करून खाद्यपदार्थ व्यवसायिकांना आवश्यक सूचना दिल्या. खाद्यपदार्थ दर्जेदार ठेवण्यासह किचन स्वच्छ ठेवावे, कुकने आवश्यक ती काळजी घ्यावी तसेच दुकानांचा परवाना दर्शनी भागावर लावावा, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रदीप पवार यांच्या पथकाने २३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ही कारवाई केली. या मोहिमेत हायजिन फर्स्ट संस्थेचाही पुढाकार होता. यावेळी संस्थापिका वैशाली गांधी, रूपाली बिहानी, अनुराधा रेखी, विकास जाधव, तुषार भंडारी आदी उपस्थित होते.

वैशाली गांधी म्हणाल्या, प्रोफेसर कॉलनी चौक हा हायजिन चौक करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खाद्यपदार्थांच्या स्टॉलची तपासणी करून संबंधित व्यवसायिकांना स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. नगरकरांना स्वच्छ, सुरक्षित आणि हायजिनिक खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था शहरात सातत्याने काम करत आहे. खाद्यपदार्थ व्यवसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक जनजागृती करण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे वैशाली गांधी यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले, महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खाद्यपदार्थांमध्ये होणाऱ्या भेसळीविरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची असून त्याचे कौतुक केले पाहिजे. हायजिन फर्स्ट संस्था गेल्या अकरा वर्षांपासून शहरातील नागरिकांना चांगले आरोग्य मिळावे, यासाठी समाजामध्ये तसेच खाद्यपदार्थ व हॉटेल व्यावसायिकांमध्ये स्वच्छता आणि आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे काम करत आहे. नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी संस्थेकडून करण्यात येणारे प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे बारस्कर यांनी सांगितले.

रूपाली बिहानी म्हणाल्या, प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांचे स्टॉल आहेत. या स्टॉलची स्वच्छता राखणे तसेच नागरिकांना चांगल्या दर्जाचे खाद्यपदार्थ उपलब्ध करून देणे ही खाद्यपदार्थ व्यावसायिकांची जबाबदारी आहे. नागरिकांना चांगले आणि स्वच्छ खाद्यपदार्थ मिळावेत, यासाठी हायजिन फर्स्ट संस्था सातत्याने काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

### दुकानदारांवर कारवाईचा इशारा

दर्जेदार खाद्यपदार्थांचा वापर करावा, किचनची नियमित स्वच्छता ठेवावी, कुकने स्वच्छतेची आवश्यक काळजी घ्यावी, दुकानाचा परवाना दर्शनी भागावर लावावा, भविष्यात या नियमांचे पालन न झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा अन्नसुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार यांनी येथील स्टॉलधारक, दुकानदारांना दिला.

# फ्रॅक्चर पाय, शस्त्रक्रिया हृदयाची!




खासगी रुग्णालयामध्ये एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला असून या प्रकरणाची चौकशीही सुरू करण्यात आली आहे. पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे उपचारांसाठी दाखल केलेल्या महिलेच्या हृदयाचे ऑपरेशन डॉक्टरांनी केले. पायाचे हाड तुटलेले असल्याने रुग्णालयात भरती झालेल्या या महिलेच्या हृदयामध्ये डॉक्टरांनी ऑपरेशन करुन 'स्टेंट' बसवला. आश्चर्याची गोष्टमध्ये हे ऑपरेशन करण्याआधी कुटुंबीयांना याविषयी कोणतीही माहिती देण्यात आली नव्हती. तसेच कुटुंबीयांची कोणत्याही प्रकारची संमती रुग्णालयाने घेतली नव्हती, असा आरोप महिलेच्या नातेवाइकांनी केली आहे. ऑपरेशन झाल्यानंतर काही वेळाने या महिलेचा मृत्यू झाला असून पोलिसांनी डॉक्टरांविरुद्ध एफआयआर दाखल केला असून चौकशी सुरू केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना हरियाणातील पानिपतमधील जीटी रोडवरील 'पार्क हॉस्पिटल'मध्ये घडली आहे. मयत महिलेचे नाव गुड्डी देवी असे आहे. कुटुंबीयांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, मूळच्या उत्तर प्रदेशातील कानपूर देहात येथील रहिवासी असलेल्या आणि सध्या रमेश नगरमध्ये राहणाऱ्या गुड्डी यांचा अपघात झाला. २४ जुलै रोजी झालेल्या या रस्ते अपघातात गुड्डी यांचा पाय मोडला. त्यानंतर त्यांना ऑर्थोपेडिक ट्रीटमेंटसाठी 'पार्क हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले. खासगी रुग्णालयात दाखल केल्यास चांगले उपचार मिळतील अशी त्यांच्या कुटुंबीयांना अपेक्षा होती; मात्र घडले अगदी उलट! गुड्डी देवी यांचा मुलगा कुलदीपने केलेल्या दाव्यानुसार, त्याच्या आईवर हृदयाची शस्त्रक्रीया करण्यात आली. हृदयाशी संबंधित ऑपरेशन प्रोसिजर पूर्ण झाल्यानंतरच डॉक्टरांनी गुड्डी देवींच्या हृदयामध्ये स्टेंट बसवल्याचे सांगितल्याची माहिती कुलदीपने दिली आहे. दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, ऑपरेशन करण्यापूर्वी कुटुंबीयांचा सल्ला घेतला गेला नाही किंवा त्यांची संमतीही घेतली गेली नाही. कुलदीपने असाही आरोप केला, की हृदयाशी संबंधित या प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या संमती पत्रावर बनावट सह्या करण्यात आल्या. गुड्डी देवी यांना हृदयाशी संबंधित काही आजार आहे आणि त्यावर त्वरित उपचारांची गरज आहे, अशी कोणतीही माहिती कोणत्याही डॉक्टरने किंवा रुग्णालयाच्या अधिकाऱ्याने आम्हाला दिली नव्हती, असेही कुलदीपने म्हटले आहे. त्याऐवजी, हृदयाशी संबंधित ऑपरेशन पूर्ण झाल्यानंतरच कुटुंबातील सदस्यांना त्याबद्दल समजले. कुटुंबीयांनी रुग्णालयावर वैद्यकीय निष्काळजीपणा, फसवणूक आणि अनावश्यक वैद्यकीय प्रक्रिया केल्याचा आरोप केला आहे. गरज नसताना केलेल्या उपचारामुळेच माझ्या आईचा मृत्यू झाला आहे, असे कुलदीपने म्हटले आहे. गुड्डी देवी यांच्या मृत्यूनंतर रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी कुटुंबीयांना धमकावल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

# नातं पक्षी आणि माणसांचं

कर्नाटकमधल्या मांड्या जिल्ह्यातल्या कोक्केरबेल्लूर गावात अनोखे पाहुणे येतात आणि गावातले लोक या पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न होतात. थंडीच्या दिवसात या गावात स्थलांतरित पक्षी येतात आणि इथले लोक या पक्ष्यांची आपल्या मुलींप्रमाणे देखभाल करतात. या पक्ष्यांना मुली तर त्यांच्या पिलांना नातवंड मानून सेवा केली जाते. पेलिकन आणि पेंटेड स्टॉर्कसारखे स्थलांतरित पक्षी या ठिकाणी येतात. हे पक्षी माहेरपणासाठी आले आहेत असंच इथले लोक मानतात. पेलिकन प्रजातीचे पक्षी ऑक्टोबर महिन्यात या गावात दाखल होतात. इथेच हे पक्षी अंडी घालतात. अंड्यांमधून पिल्लं बाहेर येतात. ही पिल्लं एप्रिलपर्यंत उडायला शिकतात. मगच हे पक्षी इथून जातात. बाळंतपणासाठी आलेल्या या मुलींना इथले लोक खूप जपतात. पेंटेड स्टॉर्क जातीचे पक्षी जुलै महिन्यापर्यंत इथे राहतात. पक्षी आणि गावकऱ्यांचं हे नातं पिढ्यानपिढ्यांचं आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वीपासून गावात ही परंपरा सुरू झाली. आजही इथे परंपरेचं पालन केलं जातं. गावकरी या पक्ष्यांच्या अस्तित्वाला शुभ मानतात. या पक्ष्यांच्या तसंच त्यांच्या पिल्लांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली जाते. झाडांवर बांधलेल्या घरट्यांमधून पक्ष्यांची पिल्लं जमिनीवर पडू नयेत यासाठी झाडांखाली जाळ्या बांधल्या जातात. गावकऱ्यांसोबत प्रशासनही हे काम करतं. हे पक्षी मासे खातात.. जवळच्या नदीवर जाऊन ते आपलं अन्न मिळवतात. गावकरी आणि या पक्ष्यांचं हे नातं अनोखंच म्हटलं पाहिजे.



# कॅलिडोस्कोप





## जंतर मंतरवर जुळल्या रेशीमगाठी!

दिल्लीतल्या जंतर-मंतर याठिकाणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात एखाद्याची 'लव्ह-स्टोरी' सुरू होईल, याची कोणी कल्पनाही केली नसेल; पण प्रत्यक्षात असे घडले. नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करायला गेलेल्या बिहारच्या मुलाने दिल्लीच्या मुलीशी लग्न केले आहे.


या दोघांच्या प्रेमकहाणीत जंतर-मंतरवरील आंदोलनाचा खूप मोठा वाटा आहे. कारण याच आंदोलनात दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. 'सोशल मीडिया'वर सध्या या जोडप्याचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. या दोघांची कहाणी कोणत्याही 'फिल्मी स्टोरी'पेक्षा कमी नाही. बिहारचा मोहन श्रीवास्तव जंतर-मंतर याठिकाणी आंदोलन करत होता. आंदोलनाच्या ठिकाणी खाण्यापिण्याची कोणतीच सोय नसताना दिल्लीतली एक तरुणी त्याच्यासाठी सतत काही ना काही खायला आणत होती. कधी लॉंगलता, कधी सिंघाडा.. असे दररोज काही ना काही ती खायला आणायची आणि मलाच द्यायची, असे मोहनने सांगितले.

एकेदिवशी मोहन तिला म्हणाला, 'फक्त खायलाच देशील का, पाणी कोण देणार?' तेव्हा ती तरुणी हसली आणि दुसऱ्याच दिवशी पाण्याची मोठी बाटली मोहनसाठी घेऊन आली. तेव्हा दोघांमध्ये जंतर-मंतर याठिकाणीच काही गप्पागोष्टी झाल्या. विशेष म्हणजे त्या तरुणीनेही 'नीट'ची परीक्षा दिली होती. म्हणूनच ती आंदोलनात सहभागी होण्यासाठी तिथे गेली होती.

# लग्नातच घेतला सूड



मंडप सजवलेला आहे. वधू-वर स्टेजवर बसलेले आहेत आणि लग्नातील सर्वात महत्वाचा क्षण आला आहे, कुंकू लावण्याचा. पण कुंकू उचलताच वधूचा विचार बदलतो. ती त्याच्याकडे पाहते आणि म्हणते, कृपया कुंकू लावताना काळजी घे. ते माझ्या चेहऱ्यावर पडले तर काय होईल याचा विचार कर. वर थोडा वेळ घाबरतो. नंतर हसत हसत म्हणतो हो बाळा आणि अगदी हळूवारपणे कुंकू लावण्याचा प्रयत्न करतो. तो एक छोटीशी चूक करतो आणि वधूच्या गालावर थोडे कुंकू पडते. आतापर्यंत शांत बसलेली वधू पुढच्याच क्षणी रुद्रावतार धारण करते. एकही क्षण वाया न घालवता, ती वराच्या हातातून कुंकवाची पेटी हिसकावून घेते आणि जणू सूड घेत असल्याप्रमाणे त्याच्या चेहऱ्यावर घासते. आतापर्यंत सात फेरे घेऊन सात जन्मांचे स्वप्न पाहणारा गरीब वर आता कुंकवाने माखलेल्या चेहऱ्याने शांत, असहाय्य आणि आश्चर्यचकित होऊन उभा असतो.





# ... होतील ५६ हजार नवीन तलाव?

जगात दोन लाख ते दोन लाख पंचवीस हजार हिमनद्या आहेत. यामध्ये जगातील एकूण पाण्यापैकी ६९ टक्के पाणी सामावलेले आहे. ऑस्ट्रेलिया वगळता प्रत्येक खंडात या हिमनद्या आढळतात. आर्क्टिक, अलास्का, अंटार्क्टिका, तसेच हिमालय आणि अँडीजसारख्या पर्वतरांगांमध्ये त्या मोठ्या संख्येने आहेत. हवामान बदलामुळे या हिमनद्या वितळू शकतात. यामुळे आशियासह अनेक देशांमध्ये महापूर येऊ शकतो. हिमालयातील बर्फ वितळून पृथ्वीवर ५६ हजार नवीन तलाव तयार होतील अशी भीती व्यक्त केली जात आहे.

'नेचर कम्युनिकेशन्स'मध्ये एक लेख प्रसिद्ध झाला आहे. स्वीडन, अमेरिका, स्वित्झर्लंड आणि नॉर्वे येथील संशोधकांनी पृथ्वीवरील सर्व हिम नद्यांखालील जमिनीचा नकाशा तयार केला. यावरून त्यांनी एक धक्कादायक निष्कर्ष काढला आहे. या संशोधनाबाबतची माहिती या लेखात आहे. या हिमनद्यांमधील बर्फ वितळून पृथ्वीवर ५६ हजार नवीन तलाव तयार होतील. ते सध्या पूर्णपणे गोठलेल्या तलावांची जागा घेतील अशी भीती संशोधकांनी व्यक्त केली आहे. स्वीडनमधील उपसाला विद्यापीठ, अमेरिकेतील कार्नेगी मेलन विद्यापीठ, स्वित्झर्लंडमधील लॉझान विद्यापीठ आणि नॉर्वेमधील ओस्लो विद्यापीठातील संशोधकांच्या एका पथकाने ग्रीनलँड आणि अंटार्क्टिकाच्या मोठ्या बर्फाच्या आवरणाबाहेर असलेल्या हिमनद्यांचे विश्लेषण केले. हिम नद्यांखालील जमिनीची रचना निश्चित करण्यासाठी, त्यांनी जीपीयू (जीपीयू) आणि डीप लर्निंगवर आधारित 'इन्स्ट्रक्टेड ग्लेशियर मॉडेल' नावाच्या त्रिमितीय बर्फ प्रवाह मॉडेलचा वापर केला. हिमनद्या पूर्णपणे नाहीशा झाल्या, तर पृथ्वीचा पृष्ठभाग कसा दिसेल हे समजून घेणे हा या विश्लेषणाचा उद्देश होता. याचा शोध घेणे फारच कठीण आहे. कारण हिमनद्यांचा तळ थेट दिसत नाही आणि त्यात खोल दऱ्या, खळगे, नैसर्गिक खोरे आणि वितळलेले पाणी साचू शकणारी क्षेत्रे लपलेली असू शकतात. भविष्यात किमान ०.०५ चौरस किलोमीटर क्षेत्रफळाची ५६ हजार ६५९ अशी सरोवरे तयार होऊ शकतात. ही भविष्यातील सरोवरे ४०,६४७ चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापू शकतात. ३,१३८ घन किलोमीटरपर्यंत पाणी साठवू शकतात. हे प्रमाण समुद्राच्या पातळीत ७-मिलीमीटर वाढीच्या समतुल्य आहे. ते पाणी थेट महासागरात वाहून जाण्याऐवजी या नैसर्गिक जलाशयांमध्ये तात्पुरते साठवले जाईल. नव्याने बर्फमुक्त झालेल्या जमिनीपैकी सहा टक्के जमीन सरोवरांनी व्यापली जाऊ शकते. या अभ्यासात हिमालय, काराकोरम, हिंदुकुश, पामीर आणि तियान शान पर्वतरांगांसह आशियातील उंच पर्वतीय प्रदेश असुरक्षित असल्याचे ओळखले गेले आहे.भारत, पाकिस्तान, पेरू आणि चीनसह अंदाजे १.५ कोटी लोकांचा जीव धोक्यात आहे. हिमनदीच्या सरोवरांमधून येणाऱ्या अचानक पुराचा संभाव्य धोका आहे. या अभ्यासात उंच पर्वतीय आशिया हा सर्वाधिक धोका असलेला प्रदेश असल्याचे ओळखले गेले आहे.

# हनिमूनच्या रात्रीच संशय



लग्न हे नातं विश्वासावर अधिक खुलतं. नववधू लग्न होऊन सासरी जाते तेव्हा ती फक्त एका व्यक्तीवर विश्वास ठेवते. पण तीच व्यक्ती विश्वासाला तडा देते तेव्हा... असाच काहीसा प्रकार एका जिल्ह्यात घडला आहे. हनिमूनच्या रात्री नवरीला चक्कर आली तर नवऱ्याने थेट तिला प्रेग्नेंसी टेस्ट किट दिली. हे बघून नववधू चांगलीच भडकली. एवढंच नाही तर तिने थेट माहेरी फोन करुन हा प्रकार सांगितला. यानंतर नववधूच्या माहेरच्यांनी थेट सासर गाठलं.

एका तरुणाचं पारंपरिक पद्धतीने लग्न झालं. वरात घरी पोहोचायला संध्याकाळी झाली. दिवसभराचा शीण आणि लग्नाचा ताण यामुळे नववधूला चक्कर आली. हा सगळा प्रकार बघताच वर घाबरला. त्याने हा सगळा प्रकार आपल्या मित्रांना सांगितला. तेव्हा मित्रांनी मस्करीत म्हटलं की, ही तर सगळी गरोदर असण्याची लक्षणे आहेत. या गोंधळात वर रात्रीच गावाबाहेरच्या मेडिकलमध्ये गेला आणि प्रेग्नेन्सी टेस्टचं किट विकत घेऊन आला.

हनिमूनच्या दिवशी नवऱ्याने नववधूला किट दिलं आणि टेस्ट करायला सांगितलं. हा सगळा प्रकार बघून नववधू हैराण झाली आणि तिने थेट आपल्या वहिनीला फोन केला. आपला नवरा आपल्यावर संशय घेत असल्याचं सांगितलं. एवढंच नव्हे, तर या आधी तुझा कुणासोबत संबंध होता का? असंदेखील विचारलं. वहिणीने हा सगळा प्रकार खूप गांभीर्याने घेतला आणि कुटुंबाला याची माहिती दिली. काही वेळातच नववधूच्या माहेरच्या मंडळींनी भेट घेतली आणि सासरच्या लोकांना हा सगळा प्रकार सांगितला. मुलगी लग्न होऊन घरी येताच हा सगळा प्रकार घडल्यामुळे माहेरच्यांनी कुटुंबाला जाब विचारायला सुरुवात केली. हे सगळं प्रकरण इतकं वाढलं, की गावातील लोकांना यामध्ये हस्तक्षेप करावा लागला. पंचायत बोलावण्यात आली. सुरुवातीला खूप गोंधळ झाला. नववधू आपल्या मतावर ठाम राहिली. वराने स्पष्टीकरण देताना सांगितले, की असे वागण्यामागे कोणतीही चुकीची भावना नव्हती.

दोन्ही बाजूंनी पंचायतीसमोर आपली आपली बाजू मांडली. अखेर नवऱ्याने आपली चूक मान्य करून नववधु आणि जवळच्या मंडळींकडे माफी मागितली. पंचायतीत सांगितलं की, यापुढे अशा पद्धतीचा कोणताही गैरव्यवहार होणार नाही. तेव्हा त्याने सांगितलं की, त्याला मित्रांनी चुकीचा सल्ला दिला आणि त्यानेही तो विचार न करता मान्य केला.




# नोकरी सोडून चहाची टपरी!


आजच्या धावपळीच्या जीवनात आणि मर्यादित पगाराच्या नोकरीत अनेक जण स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न पाहतात; मात्र सुरक्षित नोकरी सोडून व्यवसायात उतरण्याचे धाडस फार कमी लोक करतात. अशाच एका तरुणाची प्रेरणादायी कथा सध्या 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी सोडून त्याने रस्त्याच्या कडेला चहाची टपरी सुरू केली आणि आज त्यातून तो महिन्याला लाखोंची उलाढाल करत आहे. 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्म 'एक्स'वर अंकित पांडे नावाच्या एका वापरकर्त्याने आपल्या शेजाऱ्याची ही कथा शेअर केली आहे. त्यानुसार, संबंधित तरुण एका कंपनीमध्ये काम करत होता. सकाळी नऊ ते संध्याकाळी पाच अशी नोकरी करून त्याला दरमहा सुमारे ३८ हजार रुपये पगार मिळत होता; मात्र मर्यादित पगारवाढ, करिअरमध्ये कमी संधी आणि वाढता खर्च यामुळे तो असमाधानी होता. त्यामुळे त्याने मे महिन्यात नोकरीचा राजीनामा देत स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.


नोकरी सोडल्यानंतर संबंधित तरुणाने सुमारे दोन लाख रुपयांची गुंतवणूक करून एका ऑटो स्टँडजवळ आकर्षक चहाची टपरी सुरू केली. व्यवसाय सुरळीत चालावा यासाठी त्याने चहा बनवणे आणि ग्राहकांना सेवा देण्यासाठी दोन कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती केली. त्याच्या टपरीवर साधा चहा दहा रुपयांना तर प्रीमियम चहा वीस रुपयांना विकला जातो. अंकितच्या पोस्टनुसार, या टपरीवर दररोज सुमारे चारशे कप चहा विकला जातो. त्यातून दररोज सुमारे सहा हजार रुपयांची विक्री होते. म्हणजेच महिन्याची एकूण उलाढाल जवळपास एक लाख ऐंशी हजार रुपयांपर्यंत पोहोचते.

# सरकारी योजनेच्या आमिषाने मुंडन!

ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस अधिक धूर्त होत असताना तामिळनाडूमधील सालेम जिल्ह्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. सरकारी योजनेच्या नावाखाली १५ हजार रुपयांचे आमिष दाखवत एका भामट्याने तीन महिलांना डोके मुंडण करण्यास भाग पाडले. दुसऱ्या दिवशी कोणताही सरकारी अधिकारी न आल्याने आपण फसवणुकीचे बळी ठरलो असल्याचे महिलांच्या लक्षात आले. या प्रकरणाचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. ही घटना सालेम जिल्ह्यातील अत्तूरजवळील पुथुकोथमपाडी गावातील आहे. गावातील पलानीअम्मल यांना रात्री सुमारे आठच्या सुमारास एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख अत्तूर तहसील कार्यालयातील तहसीलदार अशी करून दिली. विशेष म्हणजे त्या व्यक्तीला पलानीअम्मल तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावेही माहिती होती. त्यामुळे त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. भामट्याने फोनवर दावा केला, की कोरोनासारखा एक नवा संसर्गजन्य आजार पसरत असून तो केसांमधून पसरतो. या आजारापासून बचाव करण्यासाठी डोके मुंडन करणाऱ्या महिलांना तामिळनाडू सरकारकडून १५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे त्याने सांगितले. तसेच शाळा आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना ४५ हजार रुपये आणि एक लॅपटॉप, तर पुरुषांना सहा हजार रुपये दिले जातील, असेही त्याने सांगितले. विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी गावासाठी केवळ १८ टोकन उपलब्ध असून दुसऱ्या दिवशी दुपारी सरकारी अधिकारी गावात येऊन लाभार्थींना रक्कम वितरित करतील; मात्र त्यासाठी आधी डोके मुंडन केलेले असणे आवश्यक असल्याचेही त्याने सांगितले. ही माहिती गावात वेगाने पसरली आणि अनेकांनी ती खरी मानली. या अफवेनंतर गावातील सुमारे २० जणांनी मुंडन करण्याची तयारी केली. त्यापैकी ५६ वर्षीय कावेरी, ५८ वर्षीय रामायी आणि ६० वर्षीय चित्रा यांनी कोणतीही शंका न घेता डोके मुंडन करून घेतले; मात्र दुसऱ्या दिवशी गावात कोणताही सरकारी अधिकारी आला नाही. संबंधित क्रमांकावर पुन्हा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाईल बंद असल्याचे आढळले.

त्यानंतर आपण फसवणुकीचे बळी ठरलो असल्याचे महिलांच्या लक्षात आले.





# अपघात रोखणारं स्मार्ट हेल्मेट

थंडीच्या दिवसात वातावरणात धुकं असतं. या धुक्यामुळे वाहनचालकांना समोरचं स्पष्ट दिसत नाही आणि अपघात होण्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. म्हणूनच एक स्मार्ट हेल्मेट तयार करण्यात आलं आहे. हे हेल्मेट दुचाकी चालकांसाठी तयार करण्यात आलं असून ते घातल्यानंतर चालकांना सतत सूचना दिली जाईल. या हेल्मेटमध्ये अल्ट्रा सोनिक सेंसर्स बसवण्यात आले आहेत. या सेंसर्समुळे समोर एखादं वाहन किंवा वस्तू असल्यास चालकाला सूचना मिळेल. १४ मीटर अंतरावरूनच चालकाला सूचना दिली जाईल. हेल्मेटवरच्या एलसीडीवर अंतरही फ्लॅश होईल. आर्मी पब्लिक स्कूलच्या संकल्पसिंह भादौरियाने हे हेल्मेट तयार केलं असून याची किंमत फक्त एक हजार रूपये आहे. या हेल्मेटची प्रतिकृती एमईटी विद्यापीठातल्या स्काय आर्ट प्रदर्शनात सादर करण्यात आली होती. या हेल्मेटला ब्रिद ॲनलायझर सिस्टिमही जोडण्यात आली आहे. यामुळे मद्यपान करणाऱ्यांच्या शरीरातल्या अल्कोहोलचं प्रमाण मोजणंही शक्य होणार आहे. चालकाच्या शरीरात अल्कोहोलचं अधिक प्रमाण असल्यास हे हेल्मेट गाडीचं इंजिन बंद करून टाकेल. म्हणजे चालकाला गाडी चालवता येणार नाही आणि अपघात टळू शकेल.

# दुष्काळ जाहीर करून ग्रामीण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा

## शहर काँग्रेस विद्यार्थी, शिक्षक विभागाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने पाहणी करून जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करावा, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक शुल्क माफ करून त्यांनी भरलेले प्रवेश व परीक्षा शुल्क परत करावे, अशी मागणी अहिल्यानगर विद्यार्थी काँग्रेस, शिक्षक काँग्रेस, क्रीडा काँग्रेस विभागाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली.



निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना डॉ. बाळासाहेब पवार, प्रवीण गीते पाटील, डॉ. बापू चंदनशिवे, नाथा आल्हाट, ॲड. अक्षय कुलट, मयूर रोहोकले आदी.

निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी हे निवेदन स्वीकारले. या निवेदनात म्हटले आहे, गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्याने ग्रामीण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेती, पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा तसेच रोजगारावर त्याचा गंभीर परिणाम झाला असून शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी वर्ग आर्थिक अडचणीत सापडला आहे. या परिस्थितीचा परिणाम ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही होत आहे. शेतीचे उत्पन्न घटल्याने अनेक कुटुंबांना महाविद्यालयीन शुल्क भरणे आर्थिकदृष्ट्या कठीण झाले आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पात्र विद्यार्थ्यांचे चालू शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण वार्षिक शैक्षणिक शुल्क माफ करावे, विद्यार्थ्यांनी भरलेली प्रवेश व परीक्षा फी परत मिळवून द्यावी किंवा त्याची संपूर्ण रक्कम शासनाने संबंधित महाविद्यालयांना अदा करावी, अशी मागणी करण्यात आली.

दुष्काळी परिस्थितीबाबत अंतिम निर्णय होईपर्यंत विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल करू नये. तसेच विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुदतवाढ देऊन विनामूल्य प्रवेशाची व्यवस्था करावी, आवश्यक कागदपत्रे व परीक्षा प्रवेशासंदर्भातील सवलतींची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक सवलत व आर्थिक मदतीचे पॅकेज शासनाने जाहीर करावे, अशी मागणी विद्यार्थी काँग्रेस व शिक्षक आघाडीच्या वतीने करण्यात आली. यावेळी अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस शिक्षक आघाडीचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, शहर काँग्रेस क्रीडा विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण गीते पाटील, शिक्षक विभागाचे राज्य सरचिटणीस डॉ. बापू चंदनशिवे, काँग्रेसचे एस.सी. विभागाचे शहराध्यक्ष नाथा अल्हाट, युवक काँग्रेसचे नगर तालुका अध्यक्ष ॲड. अक्षय कुलट, अहिल्यानगर शिक्षक विभागाचे जिल्हा सचिव मयूर रोहोकले, अजित कुऱ्हाडे, आकाश पवार, रियाज शेख, विवेक कसबे आदी पदाधिकारी उपस्थित होते.



## गुरुवाणी – ६०
## प्रज्ञेने समीक्षा करा

'जीव अंतिम समयी में जीस लोक से निकलता है, उसी लोक में पोहचता है'. जर जीव पूर्ण शरीरातून निघाला तर तो मोक्ष गतीत जातो. तीन लोकात राहणारे लोक दोन प्रकारचे असतात. काही 'त्रस' असतात, त्यांच्याकडे दोन पेक्षा जास्त इंद्रिये असतात. काही 'स्थावर' असतात, त्यांच्याकडे एकच इंद्रिय असते. ते ग्रहण करतात पण प्रतिसाद देत नाहीत. प्रश्नाचे उत्तर देणे म्हणजे प्रतिसाद देणे असते. प्रतिसाद देणारेही दोन प्रकारचे असतात. एक सज्ञनांना प्रतिसाद देतात. दुसरे दुर्जनांना प्रतिसाद देतात. काही धर्माला प्रतिसाद देतात, काही संपत्तीला प्रतिसाद देतात. जे देव गुरु धर्माला प्रतिसाद देतात ते सिद्धी मार्गावर चालतात. जे धर्माला प्रतिसाद देत नाही, ते मिथ्यात्वी असतात. असे म्हणतात की, 'जर एखादा व्यक्ती तुमच्यावर नाराज होणे बंद करतो, तेव्हा समजून घ्या तो व्यक्ती तुमच्या पासून खूप दूर गेला आहे'. नाराज होण्यासाठीही आत्मियता लागते. फक्त शेजारी शेजारी बसल्याने आत्मियता निर्माण होत नाही. काही लोक तीर्थंकर महावीरांना प्रतिसाद देतात. काही जण मुद्गरपाणिला प्रतिसाद देतात. मुद्गरपाणिला प्रतिसाद देणारे एक ना एक दिवस हत्यारे बनतातच. तर महावीर स्वामींना प्रतिसाद देणारे एक ना एक दिवस हत्याऱ्याला सिद्ध साधक बनवतातच. सुधर्मा स्वामींच्या हृदयातील महावीर अनंत आहेत. त्रस जीवावर उपचार होऊ शकतात. स्थावरवर उपचार होत नाहीत. पण तीर्थंकर परमात्मा ज्या झाडाखाली बसतात, ते झाडही बहरते. समवशरणची रचना डायमंडने होते. तुमच्याकडेही डायमंड आहे. पण तीर्थंकरांच्या समवशरणमध्ये साप आणि मुंगूसही एकत्र बसतात. डायमंड स्थावर आहे, पण तो सान्निध्यात कोणाच्या आहे, यावरून तो बदलत असतो. डायमंड बदलत असतो आणि बदलही घडवतो. त्रस नेहमीच त्रस राहिल आणि स्थावर नेहमीच स्थावरच राहिल, असे नसते. हीच आपल्या आयुष्यातील मोठी अडचण आहे. आपण कधी कोणाला प्रतिसाद देतो, कधी देत नाही. गुरूदेव म्हणायचे, 'गधे से गधे मिले करे लाथो से बात. पंडित से पंडित मिले करे ग्यान की बात'. प्रतिसाद बदलत असतो. कायम सारखाच प्रतिसाद दिला जात नाही. आपण अनुभूतीवर आधारित समीक्षा करतो. प्रज्ञेने समीक्षा केली तरच तीर्थंकर महावीरांचा धर्म कळेल. भगवान महावीरांनी गोशालकाची प्रज्ञेने समीक्षा केली व त्याच्यात परिवर्तन घडवले. हा आहे महावीरांचा धर्म. सुधर्मा स्वामींच्या हृदयातील महावीर स्वामींना जाणून घ्या.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,अहिल्यानगर

चांदेकर चेंबर्स, पानसरे गल्ली. अहिल्यानगर– ४१४००१
रजि. नं. एएनबार/आरएसआर/सीआर/१७४२/दि. २५/०१/१९९५

## थकबाकीदार व जामिनदारांसाठी सूचना

खाली नमूद कर्जदारांनी आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर यांच्याकडून घेतलेल्या कर्जाची नियमित परतफेड न केल्यामुळे संबंधित कर्ज खात्यांमध्ये थकबाकी निर्माण झालेली असून सदर खाती NPA (अनुत्पादित कर्ज खाती) म्हणून वर्गीकृत आहेत. संबंधित कर्जदार/जामीनदार यांना थकबाकी भरण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तरीही खात्यांचे नियमितीकरण झालेले नसल्याने या जाहीर सुचनेद्वारे संबंधित सर्व कर्जदार व जामीनदारांना आवाहन करण्यात येते की, ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत पतसंस्थेशी संपर्क साधून खात्यातील अद्ययावत थकीत रक्कम, व्याज व लागू शुल्क भरून खाते नियमित/निकाली काढण्याची कार्यवाही करावी.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | जामीनदाराचे नाव | कर्ज दिनांक | मूळ कर्ज रक्कम | येणे बाकी/थकबाकी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशोक भिकचंद गांधी | सुनिल विठ्ठल ढवळे<br>राजेंद्र हरी देशमुख | २९/०३/२०१९ | ३०,००,०००/- | ३५,८८,८९०/- |
| २ | राहुल कन्स्ट्रक्शन<br>अशोक भिकचंद गांधी | - | ३०/०५/२०१६ | १,५०,००,०००/- | १,४९,६२,२७५/- |
| ३ | राहुल अशोक गांधी | संतोष कटारिया<br>तुषार लकारे | ३१/१०/२०१३ | १,००,०००/- | ३,०८,५७५/- |
| ४ | भंडारी रमेश मनसुखलाल | मनसुखलाल माणकचंदभंडारी<br>रसिक मनसुखलाल भंडारी | ३१/०३/२००५ | २,००,०००/- | ५,७३,०८६/- |
| ५ | रसिक मनसुखलाल भंडारी | मनसुखलाल माणकचंदभंडारी<br>रमेश मनसुखलाल भंडारी | ३१/०३/२००५ | ३,००,०००/- | ९,१४,२८४/- |
| ६ | मनसुखलाल माणकचंद भंडारी | रमेश मनसुखलाल भंडारी<br>रसिक मनसुखलाल भंडारी | ३१/०३/२००५ | ३,००,०००/- | ८,४१,९८४/- |
| ७ | खंडेलवाल लालचंद माधवलाल | परिमल लालचंद खंडेलवाल<br>राकेश लालचंद खंडेलवाल | २०/०६/२००२ | ५०,०००/- | २२,९६, ०९४/- |
| ८ | खंडेलवाल राकेश लालचंद | परिमल लालचंद खंडेलवाल<br>लालचंद माधवलालखंडेलवाल | २०/०६/२००२ | २५,०००/- | ८,३४,७७०/- |
| ९ | खंडेलवाल परिमल लालचंद | लालचंद माधवलालखंडेलवाल<br>राकेश लालचंद खंडेलवाल | २०/०६/२००२ | २५,०००/- | ११,४९,११२/- |
| १० | देशमुख राजेंद्र हरी | सुनिल विठ्ठल ढवळे<br>वंदना राजेंद्र देशमुख | २७/०३/२०१९ | १५,००,०००/- | ३०,३२,२८९/- |
| ११ | देशमुख वंदना राजेंद्र | सुनिल विठ्ठल ढवळे<br>राजेंद्र हरी देशमुख | २५/०३/२०१९ | १५,००,०००/- | ३०,३४,८८८/- |
| १२ | शेरकर शिवानंद दत्तात्रय | उमाकांत दत्तात्रय शेरकर<br>कडूसकर विशाल दिनकर | ३०/०९/२०१९ | १०,००,०००/- | १८,३४,४३९/- |
| १३ | शेरकर उमाकांत दत्तात्रय | शिवानंद दत्तात्रय शेरकर<br>कडूसकर विशाल दिनकर | ३०/०९/२०१९ | १०,००,०००/- | १८,३९,२३९/- |
| १४ | राठोड रोहित राजेंद्र | रोहन राजेंद्र राठोड<br>प्रशांत भोसले | १६/१०/२०२० | २,००,०००/- | २,६३,१३४/- |
| १५ | राठोड रोहन राजेंद्र | रोहन राजेंद्र राठोड<br>शैलेश भंडारी | १८/१२/२०२० | २,००,०००/- | ३,४६,४७१/- |
| १६ | सपाटे प्रमोद सुभाष | मल्लेशाम व्यंकय्या ताटीपामुल<br>गणेश गंगाराम रच्चा | २/११/२००६ | १०,०००/- | ४,८२,४७३/- |
| १७ | काळे संजय रभाजी | संजय केशव कोतकर<br>सय्यद असिफ कासमअली | ३१/०१/२००५ | २५,०००/- | २,९४,१८५/- |
| १८ | खंडागळे नवनाथ विठ्ठल | महेश संभाजी पाटील<br>स्वाती नवनाथ खंडागळे | १७/१२/२०१९ | ७५,००००/- | १६,९९८/- |
| १९ | खंडागळे स्वाती नवनाथ | नवनाथ विठ्ठल खंडागळे<br>महेश संभाजी पाटील | २४/१२/२०१९ | १,२५,०००/- | १,५६,८७०/- |
| २० | कटारिया जयकुमार रायचंद | सचिन सुरेश बोथरा<br>राजेंद्र रायचंद कटारिया | १९/०४/२००५ | १,००,०००/- | १०,२२,६५५/- |
| २१ | परदेशी मोहनलाल कस्तुरचंद | परदेशी मदनलाल कस्तुरचंद<br>परदेशी रोहीत मोहनलाल | ३१/०३/२००५ | २,००,०००/- | २३,११,७४१/- |
| २२ | परदेशी शैलेश रमेशलाल | राकेश दर्शन पुरी<br>राजेश जगदीश परदेशी | १९/१०/२००० | ७५,०००/- | ७,२१,५९५/- |
| २३ | काशिद शिवाजी किसनराव | योगेश पुरुषोत्तम निसळ<br>राहुल दत्तात्रय दलाल | २३/०१/२००२ | २,००,०००/- | ८४,४०,५३५/- |
| २४ | गांधी राजु पन्नालाल | संजय माधवदास गुजराथी<br>राहुल हरकचंद मुथियान | २३/१०/२००३ | ७५,०००/- | ११,०७,८५६/- |
| २५ | ढवळे सुनिल विठ्ठल | राजेंद्र हरी देशमुख<br>वंदना राजेंद्र देशमुख | २०/०५/२०१९ | १५,००,०००/- | ३०,४१,३७६/- |
| २६ | शेरकर शिवानंद दत्तात्रय | उमाकांत दत्तात्रय शेरकर<br>कडूसकर विशाल दिनकर | २५/१०/२०१९ | ५०,०००/- | १,२४,७६५/- |
| २७ | खडके प्राजक्ता दत्तात्रय | खडके दत्तात्रय विठ्ठलराव<br>गिरीष तुकाराम जाधव | ३/०२/२००७ | ४०,०००/- | ३,९२,०८६/- |
| २८ | खडके दत्तात्रय किसन | खडके प्राजक्ता दत्तात्रय<br>गिरीष तुकाराम जाधव | ०३/०२/२००७ | ४०,०००/- | ३,९६,४७०/- |
| २९ | गुगळे कांतीलाल धनराज | शामा कांतीलाल गुगळे<br>संजय मिश्रीलाल गुगळे | ३१/०३/२००४ | २५,०००/- | ३,४६,०४०/- |
| ३० | गुगळे शामा कांतीलाल | कांतीलाल धनराज गुगळे<br>संजय मिश्रीलाल गुगळे | ३१/०३/२००४ | २५,०००- | ३,१४,०६७- |
| ३१ | खिलारी संगिता दत्तात्रय | दत्तात्रय हरिभाऊ खिलारी<br>सचिन शंकर जाधव | २९/०३/१९९९ | १०,०००/- | २,७८,७१३/- |
| ३२ | तिटकारे पुष्पा रामचंद्र | रामचंद्र खंडू तिटकारे<br>अर्जुन कुंडलिक हुशार | १८/०३/२००२ | ३०,०००/- | ९,३५,९७४/- |
| ३३ | घोरपडे ज्ञानेश्वर लहू | संजय पांडुरंग क्षिरसागर<br>बाळू रामभाऊ वाघचौरे | १९/०८/२००३ | १५,०००/- | १,४२,८६६/- |
| ३४ | गोपाळ विष्णू नारायण | गोरक्षनाथ मुरलीधर चव्हाण<br>तिरुपती मलया दोंता | ०६/०६/२०१८ | ५०,०००/- | ९४,९३५/- |
| ३५ | मदने रामचंद्र पोपट | सुरेश जालिंदर बोरकर<br>सुनिल विठ्ठल ढवळे | १८/०४/२०१९ | ७०,०००/- | ९५,४९६/- |
| ३६ | बांदल आकाश शिवाजी | पाष्टे श्रद्धा शामसुंदर<br>फाळके भरत बबन | १८/०५/२०२३ | ७५,०००/- | ९८,५४१/- |
| ३७ | पाष्टे श्रद्धा शामसुंदर | बांदल आकाश शिवाजी<br>जाफर इलियास शेख | २४/०२/२०२३ | ७५,०००/- | ८६,९७४/- |
| ३८ | जाधव संदिप विष्णु | पाटील कुलदिप प्रकाश<br>बोरुडे मयुर नवनाथ | २७/०२/२०२३ | ३५,०००/- | ६०,९१२/- |
| ३९ | बागल उज्वला गोरक्षनाथ | देठे सागर दिपक<br>बागल अनिकेत गोरख | २१/०६/२०२३ | ७५,०००/- | १,०३,७८०/- |
| ४० | बोरा भारत भिकचंद | रसिक मोतीलाल बोरा<br>सारंग भारत बोरा | २३/०१/२०२३ | ५०,०००/- | ३२,०४१/- |
| ४१ | तारु श्रीकांत मोहन | नरेंद्र सुधाकर गरुड<br>नवनाथ नामदेव राऊत | २६/०७/२०२२ | ५०,०००/- | ५६,२५४/- |
| ४२ | बोरा आदित्य अमृतलाल | संजय सुनिल काळे<br>अशोक गोपिनाथ निमसे | २४/०९/२००५ | ५०,०००/- | ७९,५२४/- |

विशेष आवाहन : थकीत कर्जदारांनी संस्थेशी त्वरित संपर्क साधून तडजोड (Settlement) करण्यासाठी पुढे यावे व उपलब्ध नियमानुसार सुलभ पद्धतीने आपले थकीत कर्ज खाते निकाली (Close) काढावे. पात्र प्रकरणांमध्ये तडजोडीबाबत संस्थेच्या नियम व मंजुरीनुसार योग्य मार्गदर्शन करण्यात येईल. वरील मुदतीत थकीत रकमेचा भरणा अथवा खात्याच्या नियमितीकरणाबाबत योग्य कार्यवाही न झाल्यास. आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. यांना कर्ज करारातील अटी व लागू कायदेशीर तरतुदीनुसार उपलब्ध असलेल्या उपाययोजनांचा अवलंब करता येईल. संस्थेचे सर्व कायदेशीर हक्क अबाधित राहतील.

आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर यांच्या वतीने
दिनांक– २३/०९/२०२६
स्थळ–अहिल्यानगर

**आनंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अहिल्यानगर**

मॅनेजर/ऑफिसर व्हा. चेअरमन चेअरमन

# आकडे टाकून वीज चोरी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल

नगर – नगर तालुक्यातील आंबिलवाडी परिसरात महावितरणच्या पथकाने केलेल्या धडक कारवाईत मीटर न बसवता परस्पर आकाडा टाकून घरगुती वापरासाठी वीज चोरी केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ प्रमाणे स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

महावितरण शाखा कार्यालय रुईछत्तीसी येथील कनिष्ठ अभियंता विकास गेनु दिवेकर (वय ४९) यांनी याप्रकरणी फिर्यादी दिल्या आहेत. महावितरणच्या पथकाने आंबिलवाडी येथील काही रहिवाशांच्या घरी वीज जोडणीची पाहणी केली असता, त्यांच्या घरी महावितरणचे वीज मीटर बसविलेले नसल्याचे आढळून आले. असे असतानाही संबंधित ग्राहकांनी बाहेरील लघु दाब वाहिनीवरून काळ्या रंगाच्या सर्व्हिस वायरच्या साहाय्याने थेट आकाडा टाकून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी घरगुती वापरासाठी वीज चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

या तिघांना वीज चोरी प्रकरणी दंडाची कारवाई करून दंड भरण्यास मुदत देण्यात आली होती, मात्र त्यांनी मुदतीत दंड न भरल्याने त्यांच्या विरुद्ध २३ सप्टेंबर रोजी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्यादी देण्यात आल्या. या फिर्यादी नुसार, आंबिलवाडी येथील आरोपी सोमनाथ गिताराम गोरे, नितीन दत्ता शेटे आणि संजय यशवंत गोरे यांच्या विरोधात वीज चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार मंगेश खरमाळे, आबासाहेब झावरे, शरद वांढेकर हे करत आहेत.

# दुष्काळी उपाययोजना करण्याची राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

## खा. निलेश लंके, आ. रोहित पवार यांनी दिले जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – पावसाळा संपत आलेला असूनही जिल्ह्यामध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. यामुळे भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने दुष्काळी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सचिव आ. रोहित पवार, खा. निलेश लंके आणि पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. सीताराम काकडे यांनी शिष्टमंडळासह जाऊन निवेदन दिले. तसेच दुष्काळी परिस्थितीबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करुन तातडीने उपाययोजना केल्या जाव्यात, अशी मागणी केली.



जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना खा. निलेश लंके, आ. रोहित पवार, सीताराम काकडे व इतर पदाधिकारी.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, पावसाअभावी मूग, सोयाबीन, बाजरी, कपाशी, कांदा आदी पिके जळून खाक झालेली आहेत.जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. त्याचबरोबर विजेचाही प्रश्न गंभीर आहे. यामुळे तात्काळ जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून शेतकरी शेतमजूर व सर्वसामान्य मोल मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कामगारांसाठी तात्काळ आर्थिक मदत करावी तसेच चारा छावण्या सुरू करून जनावरांच्या चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न सोडवावा. वन्यजीवांच्या ही पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला असून त्याकडेही यावेळी लक्ष वेधण्यात आले. शेवगाव तालुक्यातील चाळीसगावांची भगवानगड पाणी योजना तात्काळ सुरू करावी. जलजीवन मिशनची अपुरी कामे लवकर लवकर पूर्ण करून निर्माण झालेल्या या गंभीर परिस्थितीमध्ये लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. यांसह डिंभे धरणासह जिल्ह्यातील अनेक प्रश्नांवर जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले व तात्काळ या संकटावर मात करण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली.

# तुंबलेल्या चेंबर्समुळे पावसाचे पाणी दुकानात घुसून नुकसान
# रस्त्याचे काम, नियोजनाची तांत्रिक चौकशी करण्यात यावी

## योगिराज गाडे यांची मागणी

नगर – सावेडी येथील गुलमोहर रोड परिसरात २३ सप्टेंबर रोजी रात्री झालेल्या अवघ्या २० मिनिटांच्या पावसाने रिपेले बिल्डिंगमधील बेसमेंटमधील दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यावसायिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. कोहिनूर मंगल कार्यालयासमोरील या परिसरातील पावसाच्या पाण्याचा निचरा करणारे चेंबर्स तुंबल्याने पाणी दुकानांमध्ये शिरल्याचा आरोप व्यावसायिकांनी केला आहे. या प्रकाराची तातडीने तांत्रिक चौकशी करून नुकसानग्रस्त दुकानदारांना भरपाई द्यावी, अशी मागणी नगरसेवक योगीराज गाडे यांनी केली.



गुलमोहर रोड परिसरात पावसाचे पाणी दुकानात घुसून झालेल्या नुकसानीची पाहणी करताना नगरसेवक योगीराज गाडे व परिसरातील नागरिक.

गाडे यांनी २४ सप्टेंबर रोजी सकाळी घटनास्थळी भेट देऊन नुकसानग्रस्त दुकानदारांची पाहणी केली. जयंत विठ्ठलराव देशमुख, विवेक जाधव, शिवशंकर चेमटे यांच्यासह अन्य व्यावसायिकांच्या दुकानांमध्ये पाणी शिरल्याने साहित्य व व्यवसायाचे नुकसान झाले. गुलमोहर रोड परिसरात पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेल्या चेंबर्सची योग्य देखभाल झाली नसल्याने ते तुंबले होते. परिणामी अल्पावधीत झालेल्या पावसाचे पाणी रस्त्यावर साचून बेसमेंटमधील दुकानांमध्ये शिरले. या पार्श्वभूमीवर परिसरातील पाणी निचरा यंत्रणेची पाहणी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. नगरसेवक गाडे यांनी या घटनेबाबत महानगरपालिका प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले. अवघ्या २० मिनिटांच्या पावसात दुकानांमध्ये पाणी शिरणे ही सामान्य बाब नसून तुंबलेले चेंबर्स, अपुरा पाण्याचा निचरा आणि या भागातील काँक्रिट रस्त्याच्या कामाची गुणवत्ता याबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे संबंधित कामांची तातडीने तांत्रिक तपासणी करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महापालिकेच्या कामांबाबत नागरिकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित होत असताना या घटनेमुळे पुन्हा एकदा कामांची गुणवत्ता आणि नियोजनाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. चुकीचे नियोजन, निकृष्ट काम किंवा देखभालीतील निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी गाडे यांनी केली.

नुकसानग्रस्त दुकानदारांचा तातडीने पंचनामा करून झालेल्या नुकसानीचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा आणि त्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. घटना घडूनही पंचनामा न झाल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. कंत्राटदार अथवा संबंधित अधिकाऱ्यांची चूक आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करून नुकसानभरपाईची जबाबदारी निश्चित करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे आर्थिक नुकसान झालेल्या एका दुकानदाराने नैराश्यातून आत्महत्येचा विचार व्यक्त केल्याने उपस्थितांमध्ये चिंता निर्माण झाली. यावेळी गाडे यांनी संबंधित दुकानदाराचे सांत्वन करून, तुमची कोणतीही चूक नाही. कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नका; तुमच्या पाठीशी आम्ही आहोत, असा धीर दिला.

नागरिकांकडून कर वसूल करूनही मूलभूत सुविधांची अशी अवस्था होत असेल, तर प्रशासनाने आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. नागरिकांच्या जीवितासह त्यांच्या कष्टाच्या पैशाची जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची आहे. नुकसानग्रस्त दुकानदारांना न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे गाडे यांनी सांगितले.यावेळी जयंत विठ्ठलराव देशमुख, विवेक जाधव, सुयोग देशमुख, प्रथमेश महेंद्रकर, अक्षय भालेराव, रावसाहेब कवणे यांच्यासह परिसरातील नागरिक व व्यावसायिक उपस्थित होते.

# स्वस्तात सोन्याचे आमिष दाखविणाऱ्या नागपूरच्या टोळीला नगरमध्ये अटक; बनावट सोने केले जप्त

नगर – घराच्या खोदकामात सापडलेले सोने स्वस्त दरात देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या एका आंतरजिल्हा टोळीला अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. या कारवाईत नागपूर येथील एका महिलेसह अन्य दोघांना पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याकडून तब्बल १६०० ग्रॅम वजनाचे बनावट सोन्याचे दागीने आणि ११ मोबाईलसह ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राहुल शंभु सोलंकी (वय २४), नंदु मानसिंग सोलंकी (वय ३६) आणि पुजा राहुल सोलंकी (वय २४, सर्व रा. रामटेक रेल्वे स्टेशन, शीतलवाडी, रामटेक, ता. जि. नागपूर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



या घटनेतील फिर्यादी सचिन बाळासाहेब वाघ (वय ३०, रा. नवनागापूर, एमआयडीसी, अहिल्यानगर) यांना काही दिवसांपूर्वी तीन अनोळखी व्यक्ती भेटल्या होत्या. त्यांच्या घराच्या खोदकामात सोने सापडले असून, त्यातील एक किलो सोने स्वस्तात विकायचे आहे, असा बनाव या टोळीने रचला. फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांनी सोन्यासारखे दिसणारे दागीनेही दाखवले. यावर विश्वास ठेवून फिर्यादी सचिन वाघ यांनी आरोपींना एक लाख रुपये ॲडव्हान्स म्हणून दिले. उर्वरित व्यवहारासाठी आरोपींनी त्यांना २३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजता जुने आरटीओ कार्यालय परिसरात बोलावले होते. मात्र, फिर्यादी सचिन वाघ यांना या संपूर्ण व्यवहाराबाबत संशय आल्याने त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेला याची माहिती दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तत्काळ तपासाची चक्रे हलवली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार विजय ठोंबरे, संदीप पवार, शाहीद शेख, विशाल गवांदे, संतोष खैरे, रोहित मिसाळ, प्रशांत राठोड आणि भाग्यश्री भिटे यांचे विशेष पथक तयार करण्यात आले. पोलीस पथकाने २३ सप्टेंबर रोजी जुने आरटीओ कार्यालय परिसरात पंचांसमक्ष सापळा रचला. ठरल्याप्रमाणे संशयित दोन पुरुष व एक महिला त्या ठिकाणी आल्यानंतर पोलिसांनी त्यांना शिताफीने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपींची झडती घेतली असता, त्यांच्याकडे १६०० ग्रॅम वजनाचे बनावट सोन्याच्या मण्यांची माळ, ५२ हजार रुपये किमतीचे ११ मोबाईल आणि एक हँड बॅग असा मुद्देमाल आढळून आला. हा ऐवज पोलिसांनी जप्त केला. पोलिसांनी कसून चौकशी केली असता यातील मुख्य आरोपी राहुल शंभु सोलंकी याने नागपूरहून येऊन आपल्या साथीदारांच्या मदतीने नागरिकांना स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने गंडा घातल्याची कबुली दिली. हे लोक नागरिकांकडून पैसे उकळून त्यांना पितळाचे किंवा बनावट सोन्याचे दागीने विकत असत आणि या फसवणुकीसाठी जप्त केलेल्या मोबाईलचा वापर करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

